मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | मंगळवार, ६ मे २०२५ | वर्ष: ६ | अंक:१३७ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## एकनाथ शिंदे यांनी वैभवीचे फोनवरून अभिनंदन केले

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने बारावीला ८५ टक्के गुण मिळवले. याबद्दल आता तिचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले आहे. एकनाथ शिंदे यांनी वैभवीला फोन करत तिच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीबाबत देखील विचारणा केली. धनंजय देशमुख देखील यावेळी बाजूला उपस्थित होते. वैभवीला चांगले मार्क पडले आहेत म्हणून मी फोन केला, पुढे काय करणार आहे, याची विचारणा केली. तिला पुढे शिकायचे आहे, असेही शिंदे यावेळी म्हणाले.

### अग्रग्रलेख — खरीखरी

## कुठून झक् मारली...

शंभर दिवसापूर्वी अमेरिकेचे राष्ट्रपती झालेल्या ट्रम्प यांनी या शंभर दिवसात अनेक पराक्रम केलेले आहेत. त्यामुळे लवकरच ट्रम्पची शंभरी भरतेय की काय, अशी शंका आम्हाला येऊ लागलेली आहे. एखादा माणूस जेव्हा वेडेवाकडे चाळे करतो. तेव्हा त्याला वेड्याच्या इस्पितळात दाखल केले जाते. जगात बलाढ्य अशा अमेरिकेचा अध्यक्ष विचार न करता नवीन नवीन फर्माने काढतो आणि मग हीच फर्माने आपल्या उरावर बसतील. असे दिसताच त्यातून पळ काढतो. अशी कितीतरी उदाहरणे या १०० दिवसात आपण बघितली. या ट्रम्प महाशयांनी चीनला बऱ्याच धमक्या दिल्या. मात्र त्यांच्या अशा प्रकारच्या पोरखेळाचा अंदाज आधीच चीनला आला होता. त्यामुळेच चीनने आधीच अमेरिकेबरोबरचा व्यापार हळूहळू कमी करण्यास सुरुवात केलेली होती. जे इतर कोणाला जमले नाही. ते चीनने आधीच केले होते. चीन आणि अमेरिका यांच्या लढाईत आज चीन अमेरिकेच्या दादागिरीला जराही जुमानेनसा झालेला आहे. ट्रम्प यांना कर्जबाजारी असलेल्या अमेरिकेला कोणत्याही प्रकारे आर्थिक दृष्ट्या मजबूत करायचे आहे. ट्रम्प यांचा हा प्रयत्न चांगला नाही, असे आम्ही अजिबात म्हणत नाही. पण हडेलहप्पी करून एखाद्या पट्टीच्या दारुड्याला एकदम दारू पिणे बंद कर, असे जर सांगितले तर त्याचे जे हाल होतात. तसेच आज अमेरिकेचे झालेले आहेत. ट्रम्प महाशयांना ज्या ज्या वस्तू बाहेरून आयात होतात. त्या सर्व अमेरिकेत तयार करावयाच्या आहेत. आताच्या घडीला अमेरिकेतील बडेबडे उद्योग अमेरिकेच्या बाहेर गेलेले आहेत. अमेरिकेतील महागाईमुळे या उद्योगांचा उत्पादन खर्च वाढत आहे. उत्पादन निर्मिती मूल्य वाढल्याने तेच उत्पादन महागडे ठरत आहे. त्यातच ट्रम्प यांनी अमेरिकेत बंद असलेले उद्योग सुरू करण्याचे ठरविलेले आहे. कितीही प्रयत्न केला तरी त्याला किमान अजून एक ते दीड वर्ष लागेलच लागेल. इतके असून सुद्धा कोणताही उद्योगपती ट्रम्प महाशयांच्या लहरीनुसार कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करून एखादा उद्योग उभा करेल. असे अजिबात वाटत नाही. जरी एखाद्या धाडसी उद्योगपतीने एखादा उद्योग उभा केला आणि उद्या ट्रम्प यांची लहर फिरली. तर आलेल्या कहरात त्या उद्योगाचे पार बारा वाजू शकतात. ट्रम्प महाशय आज काय बोलले. उद्या काय बोलले आणि आज जे बोलले. त्या उलट परवा काय बोलतील. याची कोणालाही कशाचीही कसलीच शाश्वती नाही. त्यामुळे अमेरिकेतील उद्योग व्यवसाय सोडाच. इतर अनेक बाबींवर उलटसुलट परिणाम होत आहेत. ट्रम्प यांचे वागणे, ट्रम्प यांचे बोलणे. एखाद्याला ट्रम्प यांनी एखाद्याला प्रेमाने मिरवणे आणि एखाद्याला भिरकावणे. हे आता अमेरिकेच्या जनतेला परिपूर्ण कळून चुकलेले आहे. त्यामुळे चार महिन्यांपूर्वी पन्नास टक्क्यांच्या वर असलेली ट्रम्प यांची लोकप्रियता, त्यांच्या अशा अस्थिर वृत्तीमुळे आणि लहरी बुद्धीमुळे बरीच खाली घसरलेली आहे. दोन्ही वेळेला ट्रम्प यांच्याविरुद्ध महिला उमेदवार उभ्या होत्या. हिलरी क्लिंटन आणि कमला हॅरीस या दोन्ही महिलांच्याविरुद्ध ट्रम्प यांना विजय मिळाला होता. आता अमेरिकेतील ट्रम्प यांची घसरलेली लोकप्रियता अशीच घसरत राहिली. तर पुढे रिपब्लिकन पक्षाचे कसे होईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अमेरिकेत कुणालाही दोन वेळा म्हणजेच आठ वर्षांपेक्षा जास्त वेळ राष्ट्रपतीपदावर राहता येत नाही. त्यात बदल करण्याचा ट्रम्प यांचा इरादा आहे. पण अमेरिकेतील लोकशाही इतकी परिपक्व आहे की, ट्रम्प यांच्या या प्रयत्नाला यश मिळेल. असे जगात कुणालाही वाटत नाही. अजून तीन वर्ष सात महिने आणि काही दिवस अमेरिकन जनतेला ट्रम्प यांना झेलायचेच आहे. तोपर्यंत ट्रम्प यांना जे पेलायचे आहे. ते ट्रम्प आपल्या परीने पेलतीलच. अमेरिकन जनतेला नियमाप्रमाणे बाकी काही फारसे करता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये सध्या अमेरिकन जनता म्हणत असेल. कुठून झक् मारली आणि यांना निवडून दिले. पण आता उपयोग काय. कारण, बुंद से गई वो, हौद से नही आती!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# 7 मे रोजी संपूर्ण देशात मॉक ड्रील

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. भारत आणि पाकिस्तानचे संबंध ताणले गेलेले आहेत. अशा परिस्थितीत गृह मंत्रालयानं ७ मे रोजी सर्व राज्यांना मॉक ड्रिल आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. या दिवशी सर्व राज्यांमध्ये सायरन वाजतील. सुरक्षा यंत्रणांना यासंदर्भातील आदेश गृह मंत्रालयाकडून देण्यात आलेले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव प्रचंड वाढलेला असताना आपत्कालीन परिस्थितीत नेमकं काय करावं, याची माहिती नागरिकांना व्हावी, या हेतूनं ७ मे रोजी देशभरात मॉक ड्रील होईल.

आपत्कालीन परिस्थितीसाठी सुसज्ज राहण्याच्या दृष्टीनं ७ मे रोजी सर्व राज्यांमध्ये मॉक ड्रील करण्यात येईल. नागरी सुरक्षा अभ्यासाचा भाग म्हणून गृह मंत्रालयाकडून आदेश जारी करण्यात आलेले आहेत. मॉक ड्रीलवेळी एअर रेड वॉर्निंग सायरन वाजवण्यात येईल. शत्रूच्या हल्ल्यावेळी स्वत:ला सुरक्षित कसं ठेवायचं याचं प्रशिक्षण सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ड्रीलच्या दरम्यान ब्लॅक आऊटची तयारी करण्यात आली आहे. महत्त्वपूर्ण संस्था आणि कारखाने यांना लवकरात लवकर लपवण्याची व्यवस्थादेखील करण्यात येईल. आपत्कालीन परिस्थितीत सुटकेच्या योजना अपडेट करण्याच्या आणि त्यांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना राज्यांना देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत तातडीनं कारवाई करण्याचे आदेश दिले गेले आहेत. अंतर्गत सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीमधील तयारी मजबूत करण्यासाठी मॉक ड्रील आयोजित करण्यात येणार आहे.

**'पाक'च्या आर्थिक नाड्या आवळल्या**

दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानविरुद्ध दंडात्मक उपाययोजना कडक केल्या आहेत, असे सरकारी सूत्रांनी सोमवारी सांगितले. भारताच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) अध्यक्षांची भेट घेतली. त्यांनी पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या निधीत कपात करण्याची मागणी केल्याचे वृत्त समोर आले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मासातो कांडा यांच्याशी झालेल्या भेटीव्यतिरिक्त, अर्थमंत्र्यांनी इटलीचे अर्थमंत्री जियानकार्लो जियोर्जेट्टी यांचीही भेट घेतली. यावेळी देखील अर्थमंत्र्यांनी याच मागणीचा पुनरुच्चार केल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

# मुलींनी मारली बाजी
# बारावीचा निकाल जाहीर



**पुणे, दि. ५ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. नेहमीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. बारावी परीक्षेचा राज्याचा निकाल ९१.८८% लागला आहे. तसेच विभागीय मंडळातून कोकण विभागाने बाजी मारली तर सर्वात कमी लातूर विभागाचा निकाल लागला आहे.

सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८% असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१% आहे. फेब्रुवारी २०२४ चा निकाल ९३.३७% होता त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षीचा निकाल १.४९% नी कमी लागला आहे.

यंदा या परीक्षेसाठी ९ विभागीय मंडळांतून राज्यभरात १५,१३,९०९ विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. ८,२१,४५० मुले, तर ६,९२,४२४ मुली होत्या. मुंबई विभागात ३,५१,००० विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

३,३७३ परीक्षा केंद्रांपैकी १२४ केंद्राची होणार चौकशी

३,३७३ केंद्रांपैकी १२४ केंद्राची चौकशी होणार आहे. कारण या केंद्रांवर गैरप्रकार आढळला होता. या चौकशी दरम्यान त्रुटी आढळल्यास १२४ परीक्षा केंद्र बोर्ड कायमस्वरूपी बंद करणार असल्याचे शिक्षण मंडळाने सांगितले आहे.

| विभागनिहाय निकाल |
| --- |
| कोकण - ९६.७४% |
| कोल्हापूर - ९३.६४% |
| मुंबई - ९२.९३% |
| छत्रपती संभाजीनगर - ९२.२४% |
| अमरावती - ९१.४३% |
| पुणे - ९१.३२% |
| नाशिक - ९१.३१% |
| नागपूर - ९०.५२% |
| लातूर - ८९.४६% |

**निकालाचा टक्का घसरला**

फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये बारावीचा निकाल ९३.३७% लागला होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल १.४९% नी कमी आहे.

दरम्यान, राज्यात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा पार पडली होती. या परीक्षेत एकूण १५,०५,०३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यात ८,१०,३४८ मुले आणि ६,९४,६५२ मुली यांचा समावेश होता. महाराष्ट्रातील ३,३७३ मुख्य केंद्रावर ही परीक्षा घेण्यात आली होती.

# "आम्हाला वाचवा..." भारताच्या मित्रदेशांसमोर पाकिस्तानची मदतीची याचना

**इस्लामाबाद, दि. ५ वृत्तसंस्था**

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव उच्चांक गाठत आहे. भारताच्या वायुदल, लष्कर आणि नौदलाच्या एकत्रित युद्धसरावामुळे पाकिस्तानमध्ये खळबळ माजली असून, भारताकडून प्रतिहल्ला होऊ नये यासाठी पाकिस्तान आंतरराष्ट्रीय पातळीवर मदतीसाठी धडपड करत आहे.

भारताच्या मित्रराष्ट्रांकडून मध्यस्थीची मागणी करत, पाकिस्तानने तुर्की, इराण, अमेरिका आणि आता रशियाकडेही हात जोडले आहेत. पण या प्रयत्नांना फारसे यश मिळताना दिसत नाही. अमेरिकेने आधीच पाकिस्तानच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले असून, त्यांच्या बाजूने कुठलीही ठोस मदत केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. रशियातील पाकिस्तानी राजदूत खालिद जमाली यांनी पुतिन सरकारकडे मध्यस्थीची विनंती केली. त्यांनी १९६६ च्या ताश्कंद कराराची आठवण करून देत रशियाने पुन्हा अशीच भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. मात्र, रशियाने कोणतीही मदत करण्यास नकार दिल्याचे समोर आले आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरकची सध्या इस्लामाबादच्या दौऱ्यावर असून, लवकरच ते नवी दिल्लीलाही भेट देणार आहेत. पाकिस्तानने त्यांच्याकडेही भारताला समजावण्याचे आवाहन केले आहे. दुसरीकडे, तुर्कीकडून लष्करी मदतीची अपेक्षा करत, तुर्कीच्या युद्धनौका कराचीत दाखल झाल्या आहेत. शांततेचे आवाहन करताना पाकिस्तान आंतरराष्ट्रीय दबावाच्या माध्यमातून भारताच्या संभाव्य कारवाईला रोखण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, भारताचे बहुतेक मित्रदेश हे परिस्थितीकडे सावध नजरेने पाहत आहेत आणि पाकिस्तानच्या बाजूने उघडपणे उभे राहत नाहीत.

## अमेरिका-रशियाचा स्पष्ट नकार

## मोदींची संरक्षण सचिवासोबत मिटिंग

**नवी दिल्ली, द. ५ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ला झाल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून दिल्लीतील घडामोडींना वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल हवाई दल प्रमुखांशी ४० मिनिटे चर्चा केली. त्यानंतर संरक्षण सचिव राजेश कुमार यांच्यासोबत पंतप्रधानांनी बैठक केली. या बैठकीला हवाई दलाचे सीनिअर अधिकारीही उपस्थित होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तर देण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. भारताने पाकिस्तानवरील ॲक्शनची ब्ल्यू प्रिंटच तयार केल्याचं सांगितलं जात आहे. भारताच्या मिसाईल परीक्षण, अरबी समुद्रातील युद्धाभ्यास आणि लढाऊ जहाजांच्या तैनातीमुळे पाकिस्तानची झोप उडाली आहे. त्यामुळेच पाकिस्तान घाबरला असून वाट्टेल ती बडबड करत आहे.

# बदलापूर एन्काऊंटर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल बदलला

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

बदलापूर विद्यार्थ्यांच्या अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे यांच्या कथिक एन्काऊंटर प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला एसआयटी स्थापन करण्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने बदलला आहे. या प्रकरणात आता डीजीपी यांच्या देखरेखेखाली समिती नेमण्यात येणार आहे. बदलापूर एन्काऊंटर प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने आधी सह पोलीस आयुक्त लखमी गौतम यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेले होते.



बदलापूर येथील एका शाळेतील दोन लहान विद्यार्थीनींचे लैंगिक शोषण प्रकरणातील सफाई कामगार आरोपी अक्षय शिंदे याला तळोजा जेलमधून कल्याण येथे आणताना २३ सप्टेंबर २०२४ रोजी कथित एन्काऊंटर झाले होते. या प्रकरणात अक्षय शिंदे याच्या पालकांनी नुकसान भरपाईसाठी मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित एन्काऊंटर प्रकरणात गुंतलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर ३ मे पर्यंत केस दाखल करण्याचे आदेश ७ एप्रिल रोजी दिले होते. यामुळे राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

सरकारने यापूर्वी सर्वोच्च न्यायालयातील याचिकेचा हवाला देत या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे हस्तांतरित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाअतिरिक्त वेळ मागितला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. त्यानंतर उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आदेशाचे पालन न केल्याबद्दल अवमानाच्या कारवाईचा इशारा दिला आणि एसआयटीला गुन्हा नोंदवण्याचे आदेश दिले होते.

राज्य सरकारने सुरुवातीला तक्रारदार नसल्याचा दावा केला, परंतु अखेर न्यायालयाने ३ मे पर्यंत अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणातील गुंतललेल्या पाच पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश एसटीआयटीला दिले होते.

# पुतीन यांचा पंतप्रधान मोदींना फोन
# भारताला दिला पाठिंबा

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. संपूर्ण जग भारत आता काय कारवाई करतोय, याकडे लक्ष ठेऊन आहे. या पार्श्वभूमीवर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी सोमवारी स्वतःच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोनवरून संपर्क साधला.



यावेळी चर्चेत दहशतवादविरोधी लढाईत रशिया भारताच्या पूर्ण पाठिशी असल्याचे पुतीन यांनी मोदींना सांगितले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने याबाबतची माहिती दिली आहे.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधत जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा ज्यापैकी बहुतांश पर्यटक होते त्यांचा बळी गेला होता.

पुतीन यांनी या हल्ल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांसाठी शोक व्यक्त केला आणि भारताच्या दहशतवादाविरोधातील लढ्यात "पूर्ण पाठिंबा" देण्याचे आश्वासन दिले.

रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी ठामपणे सांगितले की, "या हल्ल्यामागील दोषींना आणि त्यांच्या समर्थकांना न्यायासमोर आणलेच पाहिजे." याबाबत माहिती देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट शेअर केली.

ही घोषणा अशा वेळेस आली आहे जेव्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला आहे. पहलगाममधील बायसरन खोऱ्यात घडलेला हा हल्ला पर्यटकांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील स्थळी झाला होता. पुतीन यांच्या या प्रतिक्रियेने भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वाचा पाठिंबा मिळाला आहे.

# अजितदादा आकाशातून पैसे आणणार नाहीत, विचार करून बोला - मुश्रीफांनी शिरसाटांना सुनावले

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

राज्यात महायुती सरकारची सर्वाधिक चर्चेत असलेली आणि लोकप्रिय ठरलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना' आता सरकारसाठी अडचण ठरू लागली आहे. या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्यात आला असल्याने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. “या खात्याचा निधी कायदेशीरपणे दुसरीकडे वळवता येत नाही, ना त्यात कपात करता येते. पण अर्थ खात्याकडून आपले डोके जास्त चालवले जात आहे,” अशी खरमरीत प्रतिक्रिया त्यांनी दिली. “जर सरकारला सामाजिक न्याय विभागाची गरजच वाटत नसेल, तर ते खातेच बंद करा.” असेही त्यांनी म्हटले आहे. तसेच अर्थखात्यात शकुनी महाभाग बसलेत आता संजय शिरसाट यांच्या वक्तव्यावर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी त्यांना खडेबोल सुनावले आहे.



हसन मुश्रीफ म्हणाले की, सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ हे माझे चांगले मित्र आहेत. परंतु ते नव्याने मंत्री झालेले आहेत. त्यांनी ज्यावेळी ही गोष्ट घडली असे त्यांना वाटले, त्यावेळीच वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन त्यांनी बसायला पाहिजे होते. वस्तुस्थिती समजून घ्यायला पाहिजे होती. आपल्याच एका ज्येष्ठ नेत्याला अशी उपमा देणे हे अतिशय अयोग्य आहे. अजित दादा हे काय आकाशातून पैसे आणणार नाहीत किंवा हे पैसे काही अजित दादांनी घरी नेलेले नाही. पैसे देताना ओढाताण होते आहे हे साहजिक आहे. मात्र असे बोलणे बरोबर नाही. आपण सगळ्यांना दिलेली आश्वासनं पूर्ण करत आहोत. त्यामुळे शिरसाठ यांनी बोलताना विचार करून बोलले पाहिजे, असे खडेबोल त्यांनी संजय शिरसाट यांना सुनावले.

संजय शिरसाट म्हणाले की, माझ्या खात्याचे पैसे इतरत्र वर्ग करण्यात आल्याचे मला माध्यमांतून समजले. याबाबत मला कोणतीही कल्पना नव्हती. जर सामाजिक न्याय खात्याची सरकारला गरज वाटत नसेल, तर ते सरळ बंद करा. हा अन्याय आहे की कट, हे मला माहित नाही. मात्र, यावर मी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. माझ्या खात्याचा निधी ना वर्ग करता येतो, ना त्यात कपात करता येते. याबाबत काय नियम आहेत की नाही, हेच कळत नाही. माझे सुमारे १५०० कोटी रुपये प्रलंबित आहेत आणि ही देणी दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. माझं काम पत्र पाठवण्यापुरतं आहे, निर्णय घेणं त्यांचं काम आहे. पण ते निर्णय कोणत्या आधारावर घेतले जातात, याची माहितीही दिली जात नाही. कायद्यानुसार सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवता येत नाही. तरीही काही अधिकारी कायद्यातील पळवाटा शोधून निधी वळवत आहेत, हे पूर्णपणे चुकीचे आहे. अशा प्रकारे दलित भगिनींसाठी असलेला निधी अन्यत्र वळवणे अन्यायकारक आहे, असे त्यांनी म्हटले होते.

# "जसे राक्षसाला रक्त लागते, तसे भाजपला दंगली लागतात"
## प्रणिती शिंदेंचा भाजपवर हल्लाबोल

**सोलापूर, दि. ५ प्रतिनिधी**

सोलापूरच्या काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकार आणि भाजपवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. "जसं राक्षसाला रक्त लागतं, तसं भाजपला दंगली लागतात," अशा शब्दांत त्यांनी भाजपच्या राजकारणावर सडकून हल्ला चढवला. "एक व्यक्ती हजारो लोकांसमोर बोलतो आणि त्याला हिटलर शाही म्हणतात," अशी टीका करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला.

राहुल गांधी यांनी सातत्याने केलेल्या मागणीमुळे केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना घेण्याचा निर्णय घेतला असल्याचा दावा करत, शिंदे यांनी सरकारकडे या जनगणनेची निश्चित मुदत लेखी स्वरूपात जाहीर करण्याची मागणी केली. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरही शिंदेंनी केंद्र सरकारला लक्ष्य केले. "हल्ला सुरू असताना पंतप्रधान मात्र बिहारमध्ये प्रचार करत होते," असा गंभीर आरोप त्यांनी केला. राज्य सरकारच्या ‘लाडकी बहिण’ योजनेवरही त्यांनी टीका केली. "योजनेचा बोजवारा उडाला आहे, निधीच नाही," असे म्हणत त्यांनी सामाजिक न्याय विभागाचे ७०० कोटी रुपये अर्थमंत्री अजित पवार यांनी या योजनेसाठी वापरल्याची माहिती दिली. त्यामुळेच सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांमध्ये नाराजी आहे, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचे पैसे मिळत नसल्याचे सांगताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मानसिकतेमुळे महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली. "प्रधानमंत्री ग्राम सडक योजना बंद झाली असून गेल्या दीड वर्षात राज्यातून एकही प्रस्ताव केंद्राकडे गेला नाही," अशीही टीका त्यांनी केली.

# आळंदी देवस्थानला ज्ञानेश्वरीच्या प्रती छपाईसाठी एक कोटी रुपये: उदय सामंत

**आळंदी, दि. ५ प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी अर्थात आळंदी देवस्थानला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रती छपाईसाठी एक कोटी रुपये देणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आळंदी येथे केली.



याबरोबरच इंद्रायणी प्रदूषणात मुक्ती बाबत करण्यात आलेला लोणावळा ते तुळापूर पर्यंतचा संपूर्ण आराखडा एमआयडीसी मार्फत राबविला जाणार आहे आणि त्याच खात्याचा मी मंत्री असल्याने हे पुण्याचे काम माझ्या हातून होणार असल्याचे देखील सामंत यांनी यावेळी सांगितले.

श्रीक्षेत्र आळंदी येथे सुरु असलेल्या संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याला सामंत यांनी भेट दिली.यावेळी त्यांनी भाविकांना संबोधित करत शासनाच्या निर्णयाची माहिती दिली. यावेळी प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ,पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे,विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज कबीरबुवा, पुरुषोत्तम महाराज पाटील,माणिक महाराज मोरे,बापुसाहेब देहूकर ,माजी नगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे,माजी विरोधी पक्षनेते डी.डी.भोसले पाटील,मुख्याधिकारी माधव खांडेकर,ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर,शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले,प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, माजी सभापती भगवान पोखरकर, शिवसेना शहर प्रमुख राहुल चव्हाण उपस्थित होते.

# ‘वक्फ’ वैधतेची सुनावणी 15 मे रोजी

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

वक्फ (दुरुस्ती) कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने पुढे ढकलली असून, आता १५ मे रोजी ही सुनावणी होणार आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर होईल, अशी माहिती सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज दिली. आजच्या सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या १३ मे रोजी होणाऱ्या निवृत्तीबाबत भावना व्यक्त करताना म्हटले, “तुमचे निवृत्त होणे आमच्यासाठी वेदनादायक आहे. आम्हाला या प्रकरणाचा पाठपुरावा तुमच्यासमोर करायला आवडले असते.” यावर उत्तर देताना सरन्यायाधीशांनी सहजपणे नमूद केले की, “मी निवृत्तीच्या दिवसाची वाट पाहतो आहे. पुढील बुधवारी (१५ मे) न्यायमूर्ती गवई यांच्या खंडपीठासमोर आपली बाजू मांडा.”



१७ एप्रिल रोजी झालेल्या मागील सुनावणीवेळी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले होते की, ५ मेपर्यंत ‘वक्फ’ म्हणून घोषित मालमत्तांची स्थिती जशी आहे तशीच राहील, त्यांच्यावर कोणताही कायदेशीर हस्तक्षेप होणार नाही. तसेच, वक्फ बोर्ड आणि परिषदेवर कोणत्याही बिगर-मुस्लिमांची नियुक्ती केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले होते.

सॉलिसिटर जनरल मेहता यांनी स्पष्ट केले की, संसदेनं हा कायदा "योग्य विचारविनिमय करून" मंजूर केला आहे आणि तो सरकारचे म्हणणे एकल्याशिवाय स्थगित करू नये.

वक्फ (दुरुस्ती) कायदा २०१३ मधील काही तरतुदींना आव्हान देणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. न्यायालयाने त्यामधून पाच प्रमुख याचिका निवडून त्यावर सुनावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने या कायद्याचा बचाव धर्मनिरपेक्ष आणि घटनासंमत म्हणून केला असून, ‘धार्मिक हस्तक्षेप’ या दाव्यांना फेटाळले आहे.

# पूंछमध्ये जेवणाच्या डब्यात आढळली स्फोटके

**पूंछ, दि. ५ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कर व तपास यंत्रणांनी जम्मू-काश्मीरमध्ये व्यापक शोधमोहीम सुरू केली आहे. दहशतवाद्यांच्या लपण्याच्या जागा व छुपे तळ शोधून काढण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून काही ठिकाणी लष्कराची थेट दहशतवाद्यांशीही चकमक होत असल्याचं समोर आलं आहे. अशाच एका मोहिमेमध्ये भारतीय सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातल्या दहशतवाद्यांच्या एका तळावर हल्ला चढवला. या हल्ल्यात हा तळ उद्ध्वस्त झाला असून तिथून मोठ्या प्रमाणावर स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत.

लष्कर व विशेष कृती दलाने संयुक्तपणे जम्मू-काश्मीरमध्ये ही शोधमोहीम राबवली आहे. या शोधमोहिमेदरम्यान सुरनकोट परिसरातील जंगलात दहशतवाद्यांच्या तळ असल्याची माहिती तपास पथकांना मिळाली. त्यानुसार, तातडीने या भागात सुरक्षा दल दाखल झालं. सूरनकोट परिसरात दहशतवाद्यांचा एक तळ सापडला असून तिथे चक्क जेवणाच्या डब्यात स्फोटकं लपवून ठेवण्यात आली होती, अशी माहिती समोर आली आहे.



लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तळावर स्फोटकं उडवण्यासाठीच्या यंत्रणेचे पाच सेट आणि दोन वायरलेस सिस्टीम आढळून आल्या. त्याशिवाय, मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा आणि इतर यंत्रसामग्रीही लष्करानं ताब्यात घेतली आहे. या तळावर सापडलेल्या पाच आयईडीमध्ये अर्धा किलो ते ५ किलोपर्यंत स्फोटकं सापडली. ही स्फोटकं त्याच ठिकाणी नष्ट करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

या पाच आयईडींपैकी दोन आयईडी दोन स्टीलच्या बादल्यांमध्ये ठेवले होते, तर तीन आयईडी चक्क जेवणाच्या डब्यात ठेवल्याचं आढळून आलं. याशिवाय युरियाची पाच पाकिटं, एक पाच लिटरचा गॅस सिलेंडर, एक दुर्बिण, तीन लोकरी टोप्या, तीन ब्लँकेट, काही पँट असं साहित्यही इथे आढळून आलं.

दरम्यान, सापडलेल्या साहित्यावरून या ठिकाणी तीन दहशतवाद्यांनी वास्तव्य केल्याचा अंदाज बांधला जात आहे. त्यांचा शोध घेतला जात असल्याची माहिती लष्करी अधिकाऱ्यांनी दिली.

पहलगाम हल्ल्याला दोन आठवडे उलटल्यानंतर सुरक्षा पथकांना हे साहित्य मिळाल्यामुळे याचा पहलगाम हल्ल्याशी काही संबंध आहे का? याचाही शोध घेतला जात आहे. पहलगाम येथे हल्ला करणारे दहशतवादी अद्याप फरार असून पोलीस व लष्कराची पथकं या दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत.

### महत्त्वाचे

## शहरात अवैध धंदे जोरात

**नाशिक ।** पोलिसांची सातत्याने कारवाई सुरू असली तरी शहरात अनेक ठिकाणी अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे चित्र आहे. कामगार वसाहत असलेल्या सिडको परिसरात तर अनेक ठिकाणी अवैध धंदे जोमात असल्याचे दिसून येते. याबाबत अनेकदा नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत. अनेकदा पोलिसांकडून कारवाई होते; परंतु दोन चार दिवस झाल्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. दारूची दुकाने आणि सार्वजनिक ठिकाणी, नागरी वसाहत परिसरात देखील अवैद्य धंदे फोफावले असल्याने याकडे पोलिसांनी गांभीर्याने बघणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. सिडकोतील त्रिमूर्ती चौक परिसरात दारूच्या दुकानानजीकच अवैध धंदे असल्याने या ठिकाणी अनेकदा वादावादी होऊन त्याचे रूपांतर गुन्हेगारी मध्ये होतात. विशेष म्हणजे त्रिमूर्ती चौकातील दारूच्या दुकाना बाहेरच अनेक मद्यपी राजरोसपणे दारू पिताना दिसतात पोलिसांकडून याबाबत कुठलीच दक्षता घेतली जात नसल्याने या ठिकाणी अनेक वेळा मद्यपीनमध्ये वाद होऊन त्याचे पर्यवसान मोठ्या हाणामाऱ्यात होते.

## स्थानिक बेरोजगारांना रोजगार न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यात शेकडो हेक्टर जमिनीचा त्याग करूनही अनेक बेरोजगारांना कंपनीचे उंबरठे झिजवावे लागतात हे तालुक्याचे मोठे दुर्भाग्य आहे. महामार्ग, रेल्वे, लष्कर हद्दी, धरणे आदींसाठी मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित झाल्या आहेत मात्र बेरोजगारांना कोणत्याच ठिकाणी काम मिळत नसल्याने हतबल झाले आहेत. स्थानिक बरोजगार तरुणांना विविध कंपन्यांमध्ये काम न मिळाल्यास मोठे जनआंदोलन उभारणार असल्याचा इशारा युवानेते बाळासाहेब झोले यांनी दिला आहे. याबाबत लवकरच कामगार मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगितले. इगतपुरी तालुक्यात बेरोजगारांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. कंपनीत कामासाठी तासनतास रांगेत उभे राहून काम मिळत नाही. राष्ट्रीयकृत बँका देखील रोजगारासाठी युवकांना कर्ज देत नाही. काहीतरी कारण सांगून त्यांची बोळवण करतात. प्रत्येक ठिकाणी फेटाळणी केली जाते. यामुळे तरुण वर्ग अधिकच संभ्रमात आहे. गोंदे औद्योगिक वसाहत हाकेच्या अंतरावर असूनही अनेकांना रोजगार मिळत नाही सर्व घटकांना एकत्र करून न्याय मिळवून देणार असल्याचे युवानेते बाळासाहेब झोले यांनी सांगितले.



## दिव्यांग पासधारकांनी युडीआयडी कार्डची छायांकित प्रत जमा करावी

**नाशिक ।** शासनाने निर्देशित केलेल्या सूचनेनुसार दिव्यांग पासधारकांनी दिव्यांग कार्डची छायांकित प्रत सिटीलिंक कार्यालयात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकच्यावतीने दिव्यांग प्रवाशांना बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग प्रवाश्यांना मोफत प्रवासाचा लाभ घेता यावा याकरिता सिटीलिंकच्या वतीने अश्या दिव्यांग प्रवाश्यांना दिव्यांग कार्ड दिले जाते. सदर कार्ड धारकांना सूचित करण्यात येत आहे कि, शासनाने निर्देशित केलेल्या सूचनेनुसार सर्व दिव्यांग पासधारकांनी आपले दिव्यांग कार्डची छायांकित प्रत (झेरॉक्स) शनिवार दिनांक ३१ मे २०२५ रोजी पर्यंत सिटीलिंक मुख्य कार्यालय येथे जमा करावी. जे दिव्यांग पासधारक कार्डची छायांकित प्रत जमा करणार नाहीत अशा दिव्यांग पासधारकांना दिनांक १ जून २०२५ रोजी पासून सिटीलिंक बसमधून मोफत प्रवासाचा लाभ घेता येणार नाही कृपया याची दिव्यांग प्रवाश्यांनी नोंद घ्यावी.



## नथू देवरे यांचे निधन

**लखमापुर ।** आघार येथील सेवा निवृत्त शिक्षक नथु काळु देवरे (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महेश्वर देवरे व पिंपळगावच्या प्रा. कावेरी पगारेंचे ते वडील होत.



## नारायण टिल्लू यांचे निधन

**नाशिकरोड ।** जुना सायखेडा रोडवरील विमल नगरमधील नारायण विष्णू टिल्लू (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर दसक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक दीपक टिल्लू आणि नासाका माध्यमिक विद्यालयाचे कर्मचारी अभय टिल्लू यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



# मराठी भाषा विभागाकडून 'अभिजात मराठी' या आगामी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा

## मराठी मनोरंजनासाठी आणि भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय सुरू

नाशिक । महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे आपल्या मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून १ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.

AI आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही आपली मायबोली अभिमानाने उभी राहावी यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे. जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

उदय सामंत आपल्या भाषणात म्हणाले ,"मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे. मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे. आज मोबाइल हातात आल्यावर आपण दररोज १-२ चित्रपट हेडफोन लावून पाहतो. जर 'अभिजात मराठी' सारखा मराठीचा स्वतंत्र ओटीटी प्लॅटफॉर्म प्रत्येकाच्या हातात असेल, तर त्यातून मराठी भाषेचं संवर्धन, प्रचार आणि उत्तम साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकतं. म्हणूनच हे व्यासपीठ अत्यावश्यक आणि अत्यंत काळानुरूप आहे." 'अभिजात मराठी' हे ओटीटी व्यासपीठ पूर्णपणे मोफत स्वरूपात प्रेक्षकांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर दर्जेदार मराठी चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपटांचा समृद्ध संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळेल. याव्यतिरिक्त, इतर भारतीय भाषांतील निवडक चित्रपट मराठीत डब करून सादर करण्यात येणार आहेत, जेणेकरून भाषेची अडचण न वाटता सर्वांना दर्जेदार आशयाचा आनंद घेता येईल. तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आशयासोबत मराठी सबटायटल्स देण्यात येणार आहेत, ज्यामुळे जागतिक कंटेंटही मायबोलीत अनुभवता येणार आहे.



'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले "'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ आहे. ही भाषा जगायची आहे, टिकवायची आहे म्हणून हे व्यासपीठ आम्ही निर्माण करतोय !" 'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार असून, तो १,००० निवडक प्रेक्षकांसाठी खास प्रिव्ह्यू स्वरूपात असेल. त्यानंतर, ऑक्टोबर २०२५ मध्ये मराठी भाषा आठवड्याच्या निमित्ताने या प्लॅटफॉर्मचा अधिकृत भव्य लॉन्च करण्यात येणार आहे. हा टप्पा मराठी प्रेक्षकांसाठी आणि संपूर्ण इंडस्ट्रीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरेल.

**नववी-दहावीच्या गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके**

# स्तुत्य उपक्रमाला नाही मिळत कुणाचेही बळ...

## 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहा'ची विद्यार्थ्यांसाठी धडपड

**नाशिक ।** नाशिकमधील दहावीच्या विद्यार्थ्यांद्वारे कार्यरत झालेला "जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह"च्यावतीने नाशिकमध्ये इयत्ता नववी व दहावीच्या गरीब, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळावीत यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. विद्यार्थी मित्रांसाठी सुरू झालेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असला तरी या विद्यार्थी समूहाला कुणाचेही सहकार्य मिळत नसल्याची खंत मात्र नक्कीच अस्वस्थ करते.

या उपक्रमासाठी सुरुवातीला केवळ शहर पातळीवर नोंदणी सुरू होती, मात्र हाच संदेश संपूर्ण जिल्ह्यात पसरल्याने जिल्हाभरातून वाढता प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी मोफत पाठ्यपुस्तकांसाठी नावनोंदणी केली असून, त्यापैकी ४५० हूनक अधिक विद्यार्थी ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. अलीकडेच, या उपक्रमासाठी सामाजिक माध्यमांद्वारे, वृत्तपत्रांद्वारे नाशिककरांना आवाहन करण्यात आले होते. मात्र, काहीच प्रतिसाद मिळालेला नसल्याचे आश्चर्य समूहाने व्यक्त केले आहे. महाराष्ट्रात समग्र शिक्षा अभियान आणि मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार कायदा २००९ अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण, सरकारी योजना, पोषणाहार आणि पाठ्यपुस्तके दिली जातात; पण नववी व दहावी या अत्यंत महत्त्वाच्या इयत्तांना कोणताच आधार उपलब्ध नाही, त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. समूहाने नाशिकमधील व्यावसायिक, उद्योजक, आमदार, खासदार यांना ईमेल आणि सोशल मीडियावर टॅग करून मदतीचे आवाहन केले आहे, मात्र अद्याप कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही. आज शिक्षण आणि सामाजिक क्षेत्राला दुय्यम दर्जा प्राप्त झाला आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानाचे नव्हे तर दिखाव्याचे माध्यम बनले आहे. राज्यात भाषिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक धोरणांवर चर्चा होते पण त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. परिणामी शिक्षणातील मूळ प्रश्न दुर्लक्षित राहतात आणि विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. नुकत्याच नाशिक शहरात एका खास सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन झाले आहे. हा कार्यक्रम महिनाभर चालणार असून, लाखो रुपयांचा खर्च आणि नाशिक महापालिकेचे सहकार्य मिळाले आहे. मात्र अशा क्षणिक कार्यक्रमांवर खर्च होतो पण समाज परिवर्तन घडवणाऱ्या उपक्रमांसाठी कोणीही पुढे येत नाही, ही खंत समूहाने व्यक्त केली आहे. या उपक्रमास मदत करणाऱ्या दात्यांना पाठ्यपुस्तकांच्या संचावर स्वतःची जाहिरात छापण्याची मुभा असेल तसेच वितरणही त्यांच्या हस्ते करण्यात येईल, असे समूहाने स्पष्ट केले आहे.

नाशिक शहरातील सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र यावे आणि समूहासोबत एकत्रित येऊन या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याच जिल्ह्यात सुरू असलेला हा शिक्षणसंघर्ष आणि मिळणारा अल्प प्रतिसाद महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. अधिक संपर्कासाठी ९५२९१९५६८८, ईमेल : jivankeshrimarathi@gmail.com

# दोन सराईत गुन्हेगार जेरबंद; १.३५ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**गुन्हे शाखा युनिट २ ची कामगिरी**

**नाशिक ।** नाशिक शहरात रिक्षा चोरीच्या गुन्ह्यांची वाढती मालिका लक्षात घेता, गुन्हे शाखा युनिट २ ने मोठी कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून १,३५,००० हजार रुपये किंमतीची चोरीची रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेला मिळालेल्या आदेशानुसार, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजनांचा भाग म्हणून गुन्हे शाखा युनिट-२चे अधिकारी, अंमलदार मोटार-सायकल व रिक्षा चोरी प्रकरणाचा तपास करीत असताना ४ मे रोजी पोउनि मुक्तारखान पठाण यांना गुप्त माहिती मिळाली की, मालेगाव-मधील रमजानपुरा परिसरात काही गुन्हेगार चोरीची रिक्षा वापरत आहेत. सपोनि हेमंत तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सना गॅरेजजवळ सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे अजीजोद्दीन रहमान मोहमद अकिल (२४) व मुस्ताक शहा शिराज शहा (२०), दोघेही रा. रमजानपुरा, मालेगाव असे सांगितले. त्यांनी सुमारे १० महिन्यांपूर्वी भद्रकाली पोलीस ठाणे हद्दीतून मोदकेश्वर मंदिराजवळून रिक्षा चोरी केल्याची कबुली दिली. तपासात ही रिक्षा भद्रकाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु. र. क्र. २२८/२०२४ कलम ३०३(२) अन्वये चोरीस गेलेली असल्याचे निष्पन्न झाले. यासोबतच त्यांनी अजून एक रिक्षा चोरी केली असल्याची कबुली दिली असून ती रिक्षा मालेगावमध्ये भिंतीजवळ लपवून ठेवली होती. दोन्ही रिक्षा पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

या कारवाईत गुन्हे शाखा युनिट-२चे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत तोडकर, सपोनि डॉ. समाधान हिरे, पोउनि मुक्तारखान पठाण, सपोउनि/गुलाब सोनार, पोहवा/ अतुल पाटील, वाल्मीक चव्हाण, मनोज परदेशी, संजय सानप, सुनील आहेर, प्रकाश बोडके, चंद्रकांत गवळी, पोअंम/ प्रविण वानखेडे, संजय पोटींदे, तेजस मते अशांनी केलेली आहे.

# रत्नागिरीतील सुवर्णदुर्ग किल्ल्यावर सापडले प्राचीन खेळांचे अवशेष



**दापोली ।** प्राचीन पटखेळ संवर्धन मोहीम महाराष्ट्र राज्य अंतर्गत प्राचीन खेळांच्या दस्तऐवजीकरण, नोंदणीचे काम सुरु असून दि. १९ एप्रिल रोजीच्या भ्रमंतीमधून सोज्वळ साळी (मोहीम प्रमुख) व उमेश पंडित यांच्या निदर्शनास आले आहे. त्याचे दस्तऐवजीकरण करण्यात आले असून, त्याची नोंद करण्यात आली आहे. कोणता खेळ सापडला असेल असे सर्वांना वाटत असणार यात शंका नाही. दक्षिण आफ्रिकेतील पारंपरिक खेळ म्हणून ओळखला जाणारा मंकला ज्याला दक्षिण भारतात पलंगुळी, अळीगुळीमाने या नावानेसुद्धा ओळखले जाते. या खेळाचे अवशेष भारतात मोठ्या प्रमाणात मिळाले असून, सोज्वळ साळी यांना आजपावेतो १००० पेक्षा जास्त खेळ महाराष्ट्रात शोधण्यात यश प्राप्त झाले आहे. या खेळाचे अवशेष नासिकमधील त्रिरश्मी लेणी (पांडवलेणी), अंकाई लेणी, रतनगड, गोंदेश्वर, टाहाकारी देवी मंदिर, ऐरेश्वर मंदिर येथे मिळाले होते, त्यासोबतच पुणे, कोल्हापूर, मुंबई, सातारा, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पालघर, सांगली या जिल्यात मोठ्या प्रमाणात सापडले असून, रत्नागिरीतील सुवर्णदुर्ग किल्ल्यात सापडले आहे.



# घराघरात वाळवणाच्या पदार्थांची लगबग सुरू

**नाशिक ।** सध्या महिला वर्गाकडून वाळवणाच्या प्रकारचे काम चालू असून पापड, कुरडई, वडे आदी कामात महिला मग्न झाल्या आहेत. बरचशा महिला नोकरी व काम धंद्यामुळे वेळ मिळत नसल्याने आयत्या मालाचे मागणी जास्त वाढत आहे. तसेच बचत गटांनाही मोठ्या प्रमाणात वाळवण्याचे काम मिळत आहे.

अनेक महिलांनी वाळवण निर्मितीचा व्यवसाय सुरू केला असून, त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. हातावर तयार केलेल्या शेवयांना चांगली मागणी आहे. याशिवाय घरगुती काळा मसाला, लाल मिरचीचे तिखट, दळलेली हळद यालाही चांगली मागणी आहे. उडीद, नागली, तांदुळाचे पापडही मोठ्या प्रमाणात केले-विकले जात आहे. याशिवाय बटाट्याचा किस, वेफर्स, साबुदाणा पापडाचीही नागरिकांकडून मागणी होत आहे. बचत गटाकडून हे वाळवणचे पदार्थ तयार केले जात असून, नवनवीन पदार्थ बनवले जात आहेत. खमंग भाजीसाठी वडे बनवले जातात. गावाकडील महिला यंदा वाळवणीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणात पडल्याचे दिसून येते.

# पंचवटी ललित कला मंडळ हे सार्वव्यापी मंडळ व्हावे : बोरस्ते

**नाशिक ।** नाशिक ही साहित्यिक, शाहीर, कलाकारांची भूमी आहे. नाशिकने आजवर चांगले कवी, लेखक, नाटककार, अभिनेते, चित्रकार, वादक, गायक महाराष्ट्राला दिले आहेत. या सर्वांसाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था कार्यरत आहे त्यात पंचवटी ललित कला मंडळ नव्याने आज स्थापन झाले असून या सगळ्या कलांचा संगम या मंडळाने करून घेतला आहे. नवोदित कलाकारांच्या पाठीवर थाप देऊन त्यांना लढा म्हणण्याची ताकद जुन्या-जाणत्यांनी द्यायला हवी त्याअर्थाने पंचवटी ललित कला मंडळाने काम करावे व सर्व कलांसाठी सर्वव्यापी भूमिका घ्यावी व मंडळ ती घेईल याची मला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडे पाहून खात्री वाटते असे प्रतिपादन माजी आमदार व ज्येष्ठ कवी नानासाहेब बोरस्ते यांनी केले. ते मु. शं. औरंगाबादकर सभागृहात पंचवटी ललित कला मंडळाच्या बोध चिन्ह अनावरण व यानिमित्ताने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बक्षीस वितरण समारंभात बोलत होते.



बोरस्ते पुढे म्हणाले की, या कलाकारांना वर्षभर व्यासपीठ उपलब्ध होईल यासाठी कार्यक्रम राबवावा व त्यासाठी आमच्यासारख्या ज्येष्ठांची काही मदत लागली तर ती आनंदाने सांगावी असे आवाहन करतो. याच कार्यक्रमात ज्येष्ठ नाट्य व्यावसायिक व सावाना पदाधिकारी जयप्रकाश जातेगावकर यांनी सांगितले की, मंडळाने नाट्य शिबिरे, कवितेची कार्यशाळा, नृत्य, गायन, वादन या कलांच्या विकसनासाठी दीर्घकालीन नियोजन करावे. ज्येष्ठ साहित्यिक पुंजाजी मालुंजकर, गिरणा गौरव प्रतिष्ठान चे अध्यक्ष सुरेश पवार, सावना पदाधिकारी सोमनाथ मुठाळ यांनीही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव प्राचार्य राजेश्वर शेळके यांनी केले. अध्यक्ष अरुण इंगळे यांनी मंडळाची भूमिका आपल्या भाषणातून बोलून दाखविली तर मंडळ पदाधिकारी राहुल सोनवणे यांनी मंडळाची आखणी याविषयी भाष्य केले. शिक्षक नेते रमेश गोहिल यांनी मंडळाने शिक्षकांसाठीही उद्बोधन शिबीर राबवावे असे आवाहन केले. मंडळाने घेतलेल्या राज्यस्तरीय स्पर्धांचे रोख बक्षीस, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यात काव्य लेखन स्पर्धेत जयश्री वाघ- प्रथम, रतन पिंगट आणि गंगा गवळी- द्वितीय तर सचिन सताळकर यांना तृतीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. गायन स्पर्धेत अमोघी कुलकर्णी यांनी प्रथम तर सृष्टी यादव आणि संजय परमसागर यांना अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. सोलो वादनात कुणाल गवळी अव्वल ठरला असून त्याच्या माऊथ ऑर्गन वादनाला प्रथम, इशिता गाडे हिला द्वितीय तर परभणीवरून आलेल्या शुभम सुकळे याच्या संबळ वादनाला तृतीय क्रमांक देण्यात आला. नृत्य स्पर्धेत वेदांत साळवी, आकांक्षा दिवेकर , सुरेख मैड यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले. एकपात्री स्पर्धेत प्रांजल सोनवणे हिने प्रथम क्रमांक पटकावला असून सुनेत्रा दिढे यांना द्वितीय तर कल्पना गवरे आणि भूषण सोनवणे यांनी तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला.या स्पर्धांचे परीक्षक म्हणून विवेक उगलमुगले, हेमंत कुलकर्णी, स्मिता जोशी , निकिता बर्वे-सोनार, ओमकार वैरागाकर, राहुल गायकवाड यांनी काम पाहिले.सर्व स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे याप्रसंगी सादरीकरण करण्यात आले. मंडळाचे प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र उगले यांनी सूत्रसंचालन केले तर आभार गोरख पालवे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अभिजित वैद्य, पंकज गवळी, प्रकाश बर्वे, रोहित कानडे, चेतन बर्वे, सोमनाथ मुर्तडक, प्रवीण जाधव, समीर शिंदे, अनिल सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. सभासद कल्याणी वाशिकर यांनी स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली होती.

## ➤ महत्त्वाचे

### सटाणा आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नाशिक ।** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये झालेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सटाणा आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलने याहीवर्षी यशाची परंपरा कायम ठेवली. शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वीतील स्वामिनी गौरव खैरनार (168 / 56.34%) व आराध्या हेमंत भामरे (138/46.30%) या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. तर इयत्ता ८ वीतील रिचा धनंजय जाधव (152/51.35%), सारंगी मनोहर भदाणे (150/50.67%), पुष्कर पंडित ठोके (146/49.32%), जान्हवी भानुदास काकूळते (136/45.94%) समर्थ सतीश रौंदळ (128/43.24 %) या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षक. विनय सोनवणे व सारिका कदम यांचे मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालक शालनताई सोनवणे तसेच शालेय समितीचे अध्यक्ष सुनील सोनवणे व शालेय समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापिका वैशाली सोनवणे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले. पंचायत समिती बागलाणच्या चित्रा देवरे, विस्तार अधिकारी हिरालाल बधान, केंद्रप्रमुख विजय पगारे यांनी विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### मखमलाबाद येथील भूमिपुत्रांकडून शाळेला देणगी

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मविप्र संचालक रमेश पिंगळे होते. यावेळी मखमलाबादचे भूमिपुत्र सेवानिवृत्त तहसिलदार उदय मोरे, सेवानिवृत्त एसीपी राष्ट्रपती पदक सन्मानीत नंदकिशोर मोरे, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक विलास केशवराव मोरे या सर्व मोरे बंधुंतर्फे त्यांची आई कै.वत्सलाबाई केशवराव मोरे यांच्या स्मरणार्थ विद्यालयास साऊंड सिस्टीमसाठी २५०००/- हजार रु.देणगी देण्यात आली. विद्यालयाच्या उपप्राचार्या विमल रायते यांनी सार्वजनिक वाचनालयासाठी ५०००/- रु.देणगी वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे यांच्याकडे सुपूर्द केली. ज्येष्ठ शिक्षिका रोहिणी सोनवणे यांनी विद्यालयाच्या वाचनालयास १६ पुस्तकांचा संच भेट दिला. या सर्व दानशूर व्यक्तिंचा शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर अभिनव स्कुल कमिटी अध्यक्ष निवृत्ती महाले, शंकरराव पिंगळे, वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष वाळू काकड, स्कुल कमिटी सदस्य ज्येष्ठ सभासद चंद्रभान पिंगळे, परसराम पिंगळे, सुभाष तिडके, माजी मुख्याध्यापक शंकरराव पिंगळे, माजी क्रिडाशिक्षक विलास मोरे, शिवाजी पिंगळे, आत्माराम भोर, विक्रम कडाळे, भास्कर तांबे, प्रमोद शिंदे, प्राचार्य संजय डेर्ले, अभिनवचे मुख्याध्यापक प्रमोद ठाकरे, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मनिषा आहेर, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, ज्युनियर कॉलेजप्रमुख विकास थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते शिवपुतळा व सरस्वती पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्राचार्य संजय डेर्ले यांनी प्रास्ताविक केले. एनसीसी सीएचएम किमेश ह्याळीज याने कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्र संचालक रमेश पिंगळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संगीत शिक्षक तुकाराम तांबे यांच्या शालेय गीतमंचाने राष्ट्रगीत व राज्यगीत सुरेल आवाजात सादर केले. अभिनव स्कुल कमिटी अध्यक्ष निवृत्ती महाले यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात मविप्र संचालक रमेश पिंगळे यांनी महाराष्ट्र व कामगार दिनाचे महत्व सांगितले. ज्येष्ठ शिक्षक अनिल पगार यांनी आभार मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी,एन.सी.सी.आर्मी व नेव्हलचे विद्यार्थी,शालेय विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.










# अभियंत्याने मलिदा वरपल्याचे स्पष्ट

## पुणेगाव कालव्यासंदर्भात माहिती देण्यास कार्यकारी अभियंता ढोकचौळेचा नकार



**नाशिक ।** शासनाच्या डोळ्यात धुळफेक करीत पुणेगाव कालव्याचे काम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असताना अपूर्ण कामाच्या बदल्यात शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा संशय असलेले कार्यकारी अभियंता मनोजकुमार ढोकचौळे यांनी सदर वादग्रस्त कामाची माहिती देणार नसल्याची मुजोर भूमिका घेतल्याने पुणेगाव कालव्याच्या कामात ढोकचौळे यांनी मलिदा वरपल्याचे आता हळूहळू स्पष्ट होत आहे. दरम्यान या प्रकरणी अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे यांच्याकडून कुठलीही कारवाई होत कोट्यवधी रुपयांची बिले सादर केली आहे. त्यापैकी नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभागा अंतर्गत येणाऱ्या पुणेगाव कालव्याच्या ० ते ६३ किलोमीटर पर्यंतच्या अनेक भागात कामे झाली नसल्याची धक्कादायक वास्तुस्थीती उघडकीस आली आहे. असे असताना या विभागाचे कार्यकारी अभियंता मनोजकुमार ढोकचौळे यांनी महामंडळाच्या डोळ्यात धुळफेक करत तब्बल १२ कोटी रुपयांचे बोगस बिल सादर केले आणि त्यापैकी ८ कोटी रुपये मंजूर करून घेतले. ढोकचौळेंच्या या भामटेपणाबद्दल थेट

### उद्दामपणा : माहिती देणार नाही काय करायचे करून घ्या...!

नसल्याने ढोकचौळेंना पाठीशी घातले जात असल्याची चर्चा सिंचन विभागात आहे. दरम्यान या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

मार्च एंडच्या नावाखाली सिंचन विभागातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांनी महामंडळाला मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे तक्रार करण्यात आली. संबंधित तक्रार मिसाळ यांनी अहिल्यानगर येथील अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे यांच्याकडे वर्ग केली. त्यानंतर शेटे यांनी या प्रकरणाच्या चौकशीचा केवळ फार्स केला आणि जाधव नामक अभियंत्याची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली. जाधव हे दुय्यम दर्जाचे अधिकारी असल्याने त्यांना कार्यकारी अभियंता ढोकचौळेंची पारदर्शक पद्धतीने चौकशी करता येणार नाही. त्यामुळे चौकशीचा फुसका बार उडवत सिंचन विभागाकडून वेळकाढूपणा केला जात आहे. पुणेगाव प्रकरणी ढोकचौळे यांना पूर्णतः वाचविण्याचे प्रयत्न केले जात असल्याचा संशय निर्माण झाला जात आहे. अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे हे नाशिक मध्ये नियुक्त असताना त्यांची व्यवस्था कोण बघत होते हे सिंचन विभागात सर्वश्रूत असून त्यामुळेच की काय ढोकचौळे यांना वाचविण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न होत असल्याची सिंचन विभागात दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकरणात मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता वर्तवली जात असून प्रत्येक अधिकारी एकमेकांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. सिंचन विभागातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना वेळीच आवर घातला नाही तर शासनाचा निधी असाच ओरबाडला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



पुणेगाव डावा कालवा
**पंचनामा**
सुधीर उमराळकर

पुणेगाव कालव्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याच्या संशयावरून या प्रकरणी ४ मार्च २०२५ रोजी माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागवली असता, आजपर्यंत संबंधित नांदूर मध्यमेश्वर विभागाने माहिती दिली नाही. याबाबत माहिती घेण्यासाठी गेलेल्या प्रस्तुत प्रतिनिधीला ढोकचौळेच्या मुजोरपणाचा सामना करावा लागला. वादग्रस्त पुणेगाव 'कालव्या संदर्भात माहिती देणार नाही, काय करायचं करून घ्या...अशा स्वरूपाची भाषा ढोकचौळे यांनी वापरली असून शासनाचा पगार घेऊन अरेरावीची भाषा करणाऱ्या मुजोर ढोकचौळेला बळ कुठून मिळते आहे, याबाबत सवाल उपस्थित केला जात आहे.

पुणेगाव कालव्या संदर्भात तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता मनोजकुमार ढोकचौळे यांनी संबंधित तक्रारदाराला थेट नोटीस दिली असून तक्रारदाराने पुरावे सादर करावे अशी धमकीवजा नोटीस ढोकचौळे यांनी तक्रारदाराला दिली आहे. वास्तविक संबंधित तक्रारीबाबतचे पुरावे हे ढोकचौळे यांच्या कार्यालयात अस्तित्वात आहे. मुळात आपल्यावरील आरोप खोटे असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी ही ढोकचौळे यांची असताना त्यांनी उलट तक्रारदारालाच नोटीस काढून स्वतःच्या अकलेचे तारे तोडले आहेत. ढोकचौळे यांनी तक्रारदाराला कुठल्या अधिकारात नोटीस दिली? अशा पद्धतीने नोटीस देण्याचा अधिकार त्यांना आहे का ? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. तक्रारदाराच्या पत्राला नोटीसीचे स्वरूप देणाऱ्या ढोकचौळेची मानसिकता तपासणी गरजेचे असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प विभागातील कर्मचाऱ्यांना देखील कार्यकारी अभियंता ढोकचौळे यांच्या मुजोरपणाचा फटका बसत आहे. ढोकचौळेच्या लहरी स्वभावामुळे कार्यालयात समन्वय नसल्याचे दिसून येत आहे.ढोकचौळे यांच्या दहशतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये अक्षरशः भीतीचे वातावरण असून, ढोकचौळे बाहेरचा राग हे कर्मचाऱ्यांवर काढत असल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. ढोकचौळे यांची या विभागाकडून तात्काळ हकालपट्टी करा अन्यथा या कार्यालयामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

# त्र्यंबकेश्वर मंदिर : बेकायदेशीरपणे लाडू विक्री प्रकरणी गुन्हा दाखल करा

## पुरातत्त्व विभागाचे पोलिसांना पत्र

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात बेकायदेशीर पद्धतीने लाडू विक्री केली जात असल्याच्या दै. महासागराच्या वृत्ताची दखल घेत भारतीय पुरातत्त्व विभागाने थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला असून मंदिराच्या विश्वस्तां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी त्रंबक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.यामुळे मनमानी करणाऱ्या विश्वस्तांवर नामुष्की ओढावली असून याबाबत पोलीस गुन्हा दाखल करणार का ? असा सवाल विचारला जात आहे.







त्र्यंबकेश्वर मंदिर हे राष्ट्रीय स्थळ असून त्याच्या देखभालीची जबाबदारी पुरातत्त्व विभागाकडे आहे. मंदिर परिसरामध्ये कुठलाही व्यवसाय करणे बेकायदेशीर असताना त्रंबकेश्वर देवस्थानाच्या विश्वस्त मंडळाने बेकायदेशीरपणे लाडू विक्री केंद्राला परवानगी दिली होती. या गैरकृत्याला दै. 'महासागर' ने वाचा फोडल्यानंतर महासागराच्या वृत्ताची दखल घेत पुरातत्त्व विभागाने थेट मंदिराच्या विश्वस्तांविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर हे संरक्षित राष्ट्रीय स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्राचीन स्मारक आणि प्राचीन स्थळ अवशेष अधिनियम १९५८ चे खंड १० आणि १९ च्या अंतर्गत मंदिर तसेच संरक्षित क्षेत्रास जो कुणी हानी पोहोचवेल किंवा दुरुपयोग करेल त्याला दोन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि एक लाख रुपये पर्यंत दंड होऊ शकतो. असे असताना त्र्यंबकेश्वर मंदिराच्या संरक्षित क्षेत्रात देवस्थान विश्वस्तांकडून अनधिकृतपणे लाडू विक्री केंद्र सुरू करण्यात आले होते. ही बाब पुरतत्व स्थळ तथा अवशेष अधिनियमाचा भंग करणारी आहे. लाडू विक्री केंद्र बंद करण्याबाबत मंदिर प्रशासनाला सूचित करण्यात आले होते. परंतु असे असताना विश्वस्तांनी बेकायदेशीर पद्धतीने लाडू विक्री केंद्र सुरूच ठेवले. त्यामुळे देवस्थानच्या विश्वस्थांविरुद्ध गुन्हा दाखल करा असे पुरातत्व विभागाने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

## योग दिनाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रम संपन्न

**नाशिक ।** योग विद्या भारतीय परंपरेचा एक भाग आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परिश्रमातून योग जगासाठी अमूल्य भेट ठरला आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात जगभरातील विविध देशातील नागरिक सहभागी होत आहेत. यामुळे जगातील नागरिकांसाठी योग विद्या आरोग्यदायी आधार ठरली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याण मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी येथे केले.




केंद्रीय आयुष मंत्रालयातर्फे आज सकाळी गौरी पटांगण, नाशिक येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा ५० वा योग दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार भास्कर भगरे, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे डॉ. काशिनाथ समगण्डी, योग विद्या गुरुकुलचे डॉ. विश्वास मंडलिक आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते योग संगम पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय मंत्री श्री. जाधव म्हणाले की, नाशिक शहर हे अध्यात्म आणि संस्कृतीचे केंद्र आहे. दर १२ वर्षांनी येथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. कुंभमेळा आस्था आणि परपंरेचा संगम आहे. त्याच प्रमाणे योग स्वास्थ्य, संस्कृती आणि एकतेचा संगम ठरेल. गोदावरी नदीच्या काठावर योग दिनाचा कार्यक्रम होत आहे ही समाधानाची बाब आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०२५ रोजी विविध कार्यक्रम होणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम होत आहे. योग दिनाच्या माध्यमातून 'वसुधेव कुटुंबकम' ही संकल्पना साकारली जात आहे. योग दिन हा एक उत्सव आहे. यातून मानवी जीवनात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. योग दिनाचा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय उत्सव झाला आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'एक पृथ्वी, एक स्वास्थ्यासाठी योग' अशी संकल्पना मांडली आहे. त्यामुळे जागतिक आरोग्यासाठी भारत प्रतिबद्ध असल्याचे स्पष्ट होते, या उपक्रमातून जग एक परिवार असल्याची भावना अंगीकारावी. यातून योगाचे होणारे लाभ याविषयी माहिती द्यावी, असेही मंत्री श्री. जाधव यांनी सांगितले. आयुष मंत्रालयाच्या संयुक्त सचिव डॉ. मोनालिसा दास यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी योगाची विविध प्रात्यक्षिके सादर केली.

# सर्वसामान्यांना आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी : जाधव

**नाशिक ।** ग्रामीण भागातील जनतेस प्रभावी, सहज साध्य व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी राज्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राबविले जाते. या अभियांतर्गत आरोग्य विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सर्वसामान्य नागरीकांना उत्तम आरोग्य सुविधा प्राप्त करून द्याव्यात, असे निर्देश केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याण मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी येथे केले.



शासकीय विश्रामगृह, नाशिक येथील सभागृहात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आढावा बैठकीत केंद्रीय मंत्री श्री. जाधव बोलत होते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई येथील अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, नाशिकचे उपअभियंता भुषण देसले, बुलढाणा येथील उप अभियंता अभिषेक जवकार उपस्थित होते. केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याण मंत्री श्री. जाधव यांनी यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान, पीएम- आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान (PM- ABHI), आयुष योजना, 15 वा वित्त आयोग याअंतर्गत करण्यात आलेली कामे, प्रस्तावित कामे व प्रलंबित असलेली कामे यांचा आढावा घेतला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रम अंमलबजावणी योजनेत मंजूर असलेल्या कामांची वर्षनिहाय प्राधान्यक्रमानुसार यादी सादर करावी, अशा सूचना मंत्री श्री. जाधव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रांची बांधकाम करतांना काम गुणवत्तापूर्वक व उत्तम दर्जाची होतील याकडे प्रामुख्याने भर द्यावा. 15 वा वित्त आयोग अंतर्गत आरोग्य विषयक विविध चाचण्या करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रयोगशाळा या पूर्ण क्षमतेने सुरू कराव्यात. तसेच राज्यात ज्या ठिकाणी आरोग्य विषयक सेवा देणारी दवाखाने व प्रयोगशाळा इमारतींची कामे सुरू आहेत, त्यांची अंदाजपत्रकासह नमूद केलेल्या बाबींसह तपासणी करण्यात येणार असल्याचेही केंद्रीय मंत्री श्री. जाधव यांनी सांगितले.

# ट्रम्प उघडणार अमेरिकेतील सर्वात धोकादायक तुरुंग

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अल्काट्राझ तुरुंग पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर म्हटले की, सर्वात धोकादायक गुन्हेगारांना येथे ठेवतील. ट्रम्प म्हणाले की त्यांनी न्याय विभाग, एफबीआय आणि होमलँड सिक्युरिटीला अल्काट्राझची पुनर्बांधणी करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आदेश दिले आहेत.

ट्रम्प म्हणाले की अल्काट्राझ पुन्हा उघडणे म्हणजे खऱ्या अर्थाने कायदा आणि सुव्यवस्था पुनर्संचयित करणे. अमेरिकेने अलीकडेच मध्य अमेरिकन देश एल साल्वाडोरसोबत हिंसक गुन्हेगार आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना आश्रय देण्यासाठी करार केला आहे.

देशात धोकादायक गुन्हेगारांना ठेवणे ही एक गरज बनली आहे, अनेक 'बदमाश न्यायाधीश' वारंवार कैद्यांना त्यांच्या खटल्यांच्या सुनावणीदरम्यान उपस्थित राहण्यास बोलावतात. यामुळे देशावरील भार वाढतो, असेही ते म्हणाले.

अल्काट्राझ हे अमेरिकेतील सर्वात कठीण तुरुंगांपैकी एक मानले जात असे, जिथे सर्वात धोकादायक कैद्यांना ठेवले जात असे. त्याला 'द रॉक' असेही म्हणतात. हे कॅलिफोर्नियातील सॅन फ्रान्सिस्को खाडीतील एका बेटावर आहे. हे तुरुंग १९३४ ते १९६३ पर्यंत वापरात होते. जास्त खर्च आणि देखभालीच्या समस्यांमुळे ते बंद करण्यात आले.

या तुरुंगात इटालियन-अमेरिकन माफिया डॉन अल कॅपोन, कुख्यात गुंड जॉर्ज 'मशीन गन' केली, रॉबर्ट स्ट्राउड होते. या तुरुंगात असताना, स्ट्राउडने पक्ष्यांवर 'डायजेस्ट ऑन द डिसीजेस ऑफ बर्ड्स' हे त्यांचे अतिशय लोकप्रिय पुस्तक लिहिले. यानंतर त्याला 'बर्डमॅन ऑफ अल्काट्राझ' असे नाव देण्यात आले.

येथे कैद्यांना कडक देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. त्यांना एकमेकांशी बोलण्याची परवानगी नव्हती. अनेक कैद्यांना महिनोनमहिने एका अंधाऱ्या खोलीत एकटे ठेवण्यात आले. यामुळे तिथे राहणाऱ्या कैद्यांना मानसिक आजार जडले. तुरुंगात अनेक लोकांनी आत्महत्या केल्या.





**तुरुंगातून पळून जाण्याची सर्वात प्रसिद्ध कहाणी**

अनेक कैद्यांनी तुरुंगातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, त्यापैकी बहुतेकांना मारण्यात आले किंवा पकडण्यात आले. अल्काट्राझमधून सर्वात प्रसिद्ध पलायन ११ जून १९६२ रोजी घडले. फ्रँक मॉरिस, जॉन अँग्लिन आणि क्लेरेन्स अँग्लिन तुरुंगातून पळून गेले.

या कैद्यांच्या पळून जाण्याची कहाणी १९६० मध्ये सुरू झाली जेव्हा फ्रँक मॉरिस नावाच्या कैद्याला तुरुंगात आणण्यात आले. त्याने तुरुंगातील इतर तीन कैद्यांशी मैत्री केली: जॉन अँग्लिन, क्लेरेन्स अँग्लिन आणि ॲलन वेस्ट. डिसेंबर १९६१ मध्ये या चौघांनी तुरुंगातून पळून जाण्याचा कट रचला.

खरं तर, त्याने पाहिले की तुरुंगाच्या खोलीच्या वायुवीजनात एक जाळी होती जिथून बाहेर पडता येत असे. हे तुरुंग एका बेटावर बांधले गेले होते. जास्त आर्द्रतेमुळे सिमेंट कमकुवत होईल ज्यामुळे जाळी सहजपणे काढता येईल.

अल्काट्राझ तुरुंगातील एका कोठडीतील फोटो. हा फोटो २०१० चा आहे.

अल्काट्राझ तुरुंगातील एका कोठडीतील फोटो. हा फोटो २०१० चा आहे.

चमच्याने खोदकाम करून तुरुंगातून पळून गेला, रेनकोटपासून बनवली होडी

या चार कैद्यांनी चमच्याने आणि ड्रिलने त्यांच्या कोठडीत खोदकाम केले आणि वेंटिलेशन शाफ्टकडे मार्गक्रमण केले. पळून जाण्यासाठी त्यांनी चाळीसपेक्षा जास्त रेनकोट जोडून एक होडी बनवली. त्यांनी भाग जोडण्यासाठी गरम पाईपचा वापर केला. सुरक्षा कर्मचाऱ्यांना फसवण्यासाठी त्यांनी त्यांच्या पलंगावर कागद, केस आणि साबणापासून बनवलेले बनावट डोके ठेवले जेणेकरून ते झोपलेले दिसतील.

११ जूनच्या रात्री, कैदी त्यांच्या कोठडीत बांधलेल्या बोगद्यातून तुरुंगाच्या छतावर चढले आणि नंतर पाईप्स वापरून समुद्रकिनाऱ्यावर पोहोचले. तथापि, या कैद्यांपैकी एक, ॲलन वेस्ट, असे करू शकला नाही. असे म्हटले जाते की तो शेवटच्या क्षणी भिंतीवरील प्लास्टर काढू शकला नाही. यानंतर, त्याच्याशिवाय इतर सर्व कैदी तुरुंगातून पळून गेले.

त्याने त्याच्या रेनकोटपासून बनवलेली बोट पाण्यात सोडली आणि समुद्र ओलांडण्याचा प्रयत्न केला. तथापि, तो हे करू शकला की नाही, हे आजपर्यंत कोणालाही कळू शकलेले नाही. त्याचे कोणतेही मृतदेह सापडले नाहीत.

एफबीआयच्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की त्यांची बोट समुद्रात बुडाली असावी. पण तिघांच्या नातेवाईकांनी सांगितले की ते फरार झाल्यानंतरही संपर्कात होते. घटनेच्या एका वर्षानंतर अल्काट्राझ बंद करण्यात आले. आता ते एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे. दरवर्षी सुमारे १२ लाख लोक ते पाहण्यासाठी येतात.

■ ■ ■

# लोककल्याणकारी राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!



आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०३ वी पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

२६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले.

राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कायार्चा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या.

शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली.

शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात.

शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला.

१९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले.

छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले.

त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे.

बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले.

जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कायार्चा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे.

व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

●●●●



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# बांगलादेशची निवडणुकीकडे वाटचाल




बांगलादेशचे राजकारण हळूहळू निवडणुकांकडे वाटचाल करत आहे, जरी निवडणुकीची अधिकृत तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. देशाचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी संकेत दिले आहेत की या वर्षी डिसेंबरमध्ये किंवा पुढील वर्षी जानेवारीमध्ये निवडणुका होऊ शकतात.

शेख हसीना यांची अवामी लीग आणि खालेदा झिया यांची बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) सारखे पारंपारिक पक्ष त्यासाठी तयारीत व्यस्त आहेत. त्याच वेळी, विद्यार्थी चळवळीतून उदयास आलेला 'नॅशनल सिटीझन पार्टी' (एनसीपी) हा नवीन राजकीय पक्ष देखील एक महत्त्वाची शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करू लागला आहे. बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीने सर्व ३०० जागा लढवण्याची तयारी दर्शवली आहे.

**हसीनांच्या पक्षावर बंदीची विद्यार्थ्यांची मागणी**

यावेळी बांगलादेशच्या राजकारणात विद्यार्थी संघटनांची भूमिका महत्त्वाची दिसते. राष्ट्रीय नागरिक पक्षाने महाविद्यालये आणि गावांमध्ये सक्रिय होऊन आपला ठसा उमटवण्यास सुरुवात केली आहे.

एनसीपीने स्पष्ट केले आहे की जोपर्यंत अवामी लीगवर बंदी घातली जात नाही आणि निवडणूक सुधारणा राबवल्या जात नाहीत तोपर्यंत ते या निवडणुकीला मान्यता देणार नाही. तळागाळातील संघटनात्मक रचना मजबूत करण्यासाठी, एनसीपी सतत बैठका घेत आहे आणि कट्टरपंथी धार्मिक पक्षांशी युती देखील करत आहे.

दक्षिणेकडील प्रदेशातील प्रमुख संघटक हसनत अब्दुल्ला यांच्या मते, "सुधारणा आणि अवामी लीगवर बंदी घातल्याशिवाय निवडणुका होऊ शकत नाहीत. आम्ही दोन्ही ध्येयांवर समांतरपणे काम करत आहोत." एनसीपीच्या या भूमिकेचा परिणाम आगामी निवडणुकांमधील राजकीय समीकरणांवर होऊ शकतो.

**अवामी लीगला उमेदवारांच्या हत्येची भीती**

अवामी लीग देखील निवडणुकीची तयारी करत आहे. परंतु पक्षाच्या वरिष्ठ नेत्या आणि माजी पंतप्रधान शेख हसीना भारताला गेल्यापासून पक्षाला नेतृत्वाच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. पक्षाला बंदी येण्याची भीती आहे.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मते, सर्व ३०० जागांसाठी पर्यायी उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आहे. तथापि, पक्ष नेत्यांच्या हत्या आणि अटकेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

संघटनेच्या एका वरिष्ठ नेत्याच्या मते, निष्पक्ष निवडणुका झाल्यास पक्ष परीक्षेला तोंड देण्यास तयार आहे. परंतु सध्याच्या सरकारच्या हेतूंबद्दल शंका कायम आहेत, ज्यामुळे पक्षाची रणनीती आव्हानात्मक बनली आहे.

**बीएनपीच्या सभा पुन्हा सुरू**

खालिदा यांच्या बीएनपीने सर्व ३०० जागा लढवण्याचा दावा केला आहे. पक्षाची विद्यार्थी संघटना विद्यापीठ परिसरात सक्रिय आहे आणि वारंवार बैठका घेते. बीएनपीच्या प्रवक्त्या फरजाना शर्मीन पुतुल यांच्या मते, पक्ष निवडणुकीसाठी मानसिकदृष्ट्या तयार आहे. तथापि, पक्षावर निधी संकलन आणि तळागाळातील राजकीय प्रभावाचा आरोप आहे.

पक्षाचे संभाव्य नेते तारिक रहमान यांच्या परतण्याबाबत गोंधळ आहे, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये निराशा पसरली आहे. पक्षाचे सरचिटणीस मिर्झा फखरुल आणि रुहुल कबीर रिझवी यांनी सध्याच्या सरकारच्या अंतर्गत निष्पक्ष निवडणुकांबद्दल शंका व्यक्त केली आहे.

एकूणच काय तर बांगला देशमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले असून, प्रमुख राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. मात्र अस्थिरता कायम आहे.

■ ■ ■

# अन्यथा मार्ग मोकळा...!





महायुतीमध्ये रोजच खटके उडताना दिसून येत आहे. भाजपचे मंत्री अतुल सावे यांनी शिवसेना आमदाराला झापले आहे. आमच्याकडे 237 आमदार आहे, ज्यांना युतीत राहायचंय त्यांनी राहावे, नाही तर बाहेर पडावे अशा शब्दात बाबुराव कदम कोहळीकर यांना सुनावले आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यात तांडावस्ती योजनेचा निधी आमदारांना विश्वासात न घेता परस्पर वाटप केल्याच्या आरोपावरून शिंदेसेनेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी चक्क पालकमंत्री अतुल सावे यांच्या दौऱ्यात कार्यकर्त्यांसह निषेध करण्याचा इशारा दिला.

**नेमके सावे काय म्हणाले?**

अतुल सावे म्हणाले की, मी आमदारांच्या नाराजीची खूप काळजी करत नाही. आमच्याकडे 237 आमदार आहेत, आम्ही युतीत काम करतोय, ज्याला युतीत राहायचंय त्यांनी राहावे, ज्यांना नाही राहायचे, त्यांनी बाहेर पडावे.

सावे म्हणाले की, तांडावस्तीचा प्रस्ताव हा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आला होता, असे सांगितले. आमदारांनी शिफारस केल्यानंतरच हा प्रस्ताव माझ्याकडे आला. त्यानंतर तो मंजूर करण्यात आला. यासंदर्भात तक्रार आल्यानंतर त्या प्रस्तावाला स्थगिती देण्यात आली असल्याची सारवासारव सावे यांनी केली.

**साडेसात कोटींची कामे स्थगित**

जिल्ह्यातील तांडावस्तीची कामे देताना स्थानिक आमदारांना विश्वासात घेण्यातआले नाही, अशी तक्रार भाजपचे आमदार तुषार राठोड, शिंदे गटाचे बाबूराव कदम, भीमराव केराम आदींनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री अतुल सावे यांनी मंजूर केलेली 7.35 कोटींची कामे स्थगित केली. मुख्यमंत्र्यांनी दणका दिल्यानंतर पालकमंत्री अतुल सावे हे नांदेडात नियोजन समितीच्या बैठकीचा आढावा घेण्यासाठी आले होते, त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हे म्हटले आहे.

**राज्यमंत्री बोर्डीकरांची नाराजी**

मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, माझ्या मतदारसंघात विकासकामं व्हावीत, तांडा वस्तीचा निधी मिळावा, यासाठी शिफारस केली होती. तशी मागणी केली होती. पण त्यातील एकही काम झाले नाही. पण दुसऱ्यांना ही कामे दिली गेलेली आहेत. माज्या मतदारसंघात कामे होत असताना माझी कोणत्याही प्रकारची शिफारस घेतली गेलेली नाही, अशी नाराजी बोर्डिकरांनी व्यक्त केली आहे.

■ ■ ■

## शास्त्रानुसार देवघराची रचना!

वाचक लिहितात

घरातील अत्यंत पवित्र स्थान, जिथे सकारात्मक ऊर्जा सर्वाधिक असते, ते म्हणजे देवघर! देवघर हे भक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. दररोज भक्तिभावाने पूजा केल्यास भगवंताप्रती भावजागृती निर्माण होते, मानसिक शांतता लाभते आणि आध्यात्मिक प्रगती होण्यास मदत होते.

तेव्हा देवघराची रचना शास्त्रोक्त पद्धतीने कशी असावी, हे थोडक्यात पाहू या.

ईशान्य (उत्तर-पूर्व) कोपरा देवघरासाठी सर्वोत्तम मानला जातो. कारण बृहस्पती हे ईशान्य दिशेचे स्वामी आहेत. जर हे शक्य नसेल, तर पूर्व किंवा उत्तर दिशेला देवघर ठेवता येते.

देवघर थेट फरशीवर ठेवू नये. ते संगमरवरी किंवा लाकडाचे बनलेले असावे. देव्हाऱ्यात देवतांची मांडणी करताना ती शंकूच्या आकारात करायला हवी. शंकूच्या टोकावर, म्हणजेच मध्यभागी, श्री गणपतीचे चित्र किंवा मूर्ती ठेवावी. पूजा करणाऱ्याच्या उजव्या हाताला स्त्रीदेवता आणि डाव्या हाताला पुरुषदेवता ठेवाव्यात. देवतांची संख्या अधिक म्हणजे ईश्वरी तत्त्व अधिक, असे मुळीच नाही. देवघराची रचना जर शास्त्रानुसार केलेली असेल, तर निश्चितच सकारात्मक ऊर्जा वाढण्यास मदत होते.

वरील शास्त्रशुद्ध माहिती मला सनातन संस्थेच्या "देवघर आणि पूजेतील उपकरणे" या ग्रंथात वाचायला मिळाली. या माहितीनुसार देवघराची रचना केल्यानंतर घरात सात्त्विकतेचे प्रमाण वाढले आहे. आपणही याचा लाभ घेतल्यास निश्चितच पूजेतील आनंद द्विगुणित होऊन आत्मिक शांतता लाभेल!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# हात-पाय चेहऱ्यावरील टॅनिग दुर करण्यासाठी हळदीचा उपाय एकदम खास

प्रत्येकांच्या स्वयंपाकघरात जेवण बनवताना हळद वापरली जाते. हळद केवळ अन्नाचा रंग योग्य ठेवत नाही तर आरोग्य देखील चांगले ठेवते. याशिवाय हळदीमध्ये असलेले घटक त्वचेचा रंग सुधारण्यापासून ते मुरुमे काढून टाकणे, त्वचेची जळजळ कमी करणे इत्यादी अनेक प्रकारे फायदेशीर आहेत.

उन्हाळ्यात बहुतेक लोकांना सन टॅन होण्याची समस्या भेडसावते. यामुळे त्वचेचा रंग खूप गडद दिसू लागतो आणि कधीकधी काही ठिकाणी त्वचा काळी आणि काही ठिकाणी हलकी अशी दिसत असते. या समस्येपासून सुटका मिळविण्यासाठी तुम्ही हळदीचा एक सोपा उपाय वापरून पाहू शकता.

सन टॅन टाळण्यासाठी लोकं सनस्क्रीन लोशन वापरण्यापासून ते कॉटनच्या कापडाने चेहरा झाकण्यापर्यंत अनेक पद्धती अवलंब करतात. अतिनील किरणांमुळे त्वचेचे नुकसान होऊ नये म्हणून, सनस्क्रीन लावणे आवश्यक आहे. टॅनिंग झालेली त्वचा पुन्हा



चमकदार करण्यासाठी हळदीचा हा प्रभावी उपाय करता येईल.

प्रथम एक चमचा हळद घ्या आणि तिचा रंग बदलेपर्यंत ती कोरडी भाजून घ्या. यानंतर एका भांड्यात हळद काढा आणि त्यात अर्धा चमचा कॉफी टाका. यानंतर यामध्ये मध टाकून पेस्ट तयार करा. आता टॅनिंग रिमूव्ह हळदीचा फेसपॅक तयार आहे.

हळद, कॉफी आणि मधाची तयार केलेली पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. यानंतर, ते किमान 15 मिनिटे तसेच राहू द्या. जेव्हा फेसपॅक जवळजवळ सुकत आलेला आहे असे जाणवल्यास तेव्हा टोमॅटो अर्धा कापून घ्या आणि तो गोलाकार हालचालीत चेहऱ्यावर हलक्या हातानी स्क्रब करा. थोडा वेळ मसाज करा. कमीत कमी 5 मिनिटांनी ओल्या स्पंजने चेहरा स्वच्छ करा. आठवड्यातून दोनदा हा उपाय करा. हात आणि पायांवरून टॅनिंग काढण्यासाठी देखील याचा वापर करू शकता, ज्यामध्ये तुम्ही टोमॅटोवर थोडासा लिंबाचा रस टाका आणि तो हात आणि पायांवर चोळा. जर मध तुमच्या त्वचेला सूट करत नसेल तर त्याऐवजी आंबट दहीचा वापर करा.

जर हळद, कॉफी, मध आणि टोमॅटोचा हा उपाय योग्यरित्या केल्यास टॅनिंग दूर करण्यासोबतच त्वचेचे छिद्रही घट्ट होतील आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येईल. यासोबतच रंगही चांगला होईल.

■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सिंहासन..!

बाटली बदलली
मदीरा तीच आहे..
पक्ष बदलले
चेहरे तेच आहे..

शासक बदलेले
धोरण तेच आहे ..
उदिष्ट सर्वांचे
'खुर्ची ' हेच आहे..!
खुर्ची हेच आहे ..!










## आज का अंदाज

मंगळवार ६ मे २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
**पत्थर फोड एकच**

### कल्याण बाजार

| 1 | 3 | 4 | 7 |
|---|---|---|---|
| 290 | 120 | 248 | 269 |
| 344 | 346 | 400 | 377 |
| 489 | 490 | 590 | 449 |
| 12 | 35 | 42 | 74 |
| 15 | 36 | 46 | 75 |
| 17 | 30 | 49 | 79 |


### मुंबई बाजार

| 2 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 200 | 130 | 114 | 469 |
| 336 | 357 | 268 | 568 |
| 480 | 258 | 240 | 667 |
| 24 | 52 | 62 | 92 |
| 25 | 54 | 65 | 94 |
| 29 | 59 | 69 | 97 |

६ मे २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | 41 | 52 | 63 |
| 25 | 46 | 53 | 65 |
| 29 | 48 | 56 | 69 |

# शब्दकोडे क्रमांक २१०३



**उभे शब्द :-**
१) पाण्याची जागा, तळे, तलाव वगैरे
२) उसाचे पीक
३) समुद्र
४) वेल
५) पांढरे सुगंधी फूल
६) संसर्ग
७) सत्ता
८) युद्धातील एक घोषणा
९) हरिणाची मादी
१३) ओळख
१४) सूर्याचे एक नाव
१६) धाक, दरारा
१७) सारखा
१९) शहरात राहणारा
२०) खूप मोठा, प्रचंड
२३) उद्याच्या नंतरचा दिवस
२४) वाळू
२५) यथाशास्त्र
२७) खांबावर आडवी टाकलेली तुळई
२८) दिवसाचा चोविसावा भाग
२९) आतापर्यंत
३१) पुन्हापुन्हा
३३) बगळा
३५) आवेशाने चालून जाणे
३८) दुसऱ्यासाठी खर्च करणे
४०) सुंदर युवती
४१) पारद
४७) हत्तींचा राजा
५०) राजा, सरदार इ थोर व्यक्ती
५१) रत्न
५३) विश्वास, प्रतिष्ठा, अब्रू
५४) अधिकाराचे स्थान
५७) हिन्दुस्थान
५८) पराभव
६०) तारण
६१) लहान मुलगी
६२) गावाची हद्द
६५) ऐट, दिमाख
६६) कुराणातील वचने
६७) चरण्याची जागा
६९) मान्य, आवडलेला
७०) अर्जुनाचे एक नाव
७१) कुबेराचा सेवक
७२) स्वर्गातील एक नृत्याप्सरा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**
१) भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचे संपूर्ण नाव
१०) ट्रूम, तरंग, पाण्याची उसळलेली लहर
११) एक तंतुमय वनस्पती
१२) राधानगरी येथे ह्या प्राण्याचे अभयारण्य आहे
१३) परंतु, आणि
१४) ज्वारीचा एका पदार्थ
१५) लंकेचा राजा
१७) पत्नी
१८) यश देणारा
२१) मृत्यू नसलेला
२२) शंकर
२३) पहारा करणारा
२६) एक प्राचीन पर्वत
२८) धातूचा धागा
२९) अजगर
३०) स्वस्तच्या विरुद्ध
३२) प्रश्नोत्तरे
३४) दिवस
३६) वजन, बोजा
३७) बशीचा जोडीदार
३९) एखाद्या अवयवास मुंग्या येणे
४२) विनाकारण
४३) वेदना, दुःख (हिं)
४४) सारखा
४५) पातक
४६) संताप
४८) पुष्कळ
४९) जासूद
५२) जपजाप्य
५५) किंमत
५६) रीतरिवाज
५८) तसराळे
५९) पत्थर
६३) पुरुष
६४) गवंडी
६६) नाजूक, बारीक नक्षीकाम
६८) बारा वर्षाचा काळ
७०) पोथीचे वाचन
७३) योग्य, उचित
७४) दोन महान ग्रंथ

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### प्लास्टिक कचरा संकलन स्पर्धेत उत्तमनगर अभिनव बालविकास मंदिर तृतीय

**नाशिक ।** महापालिकेच्या वतीने आयोजित स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत कचरा संकलन स्पर्धेत मविप्र संचलित सिडकोतील अभिनव बालविकास मंदिर या शाळेने तिसरा क्रमांक पटकावला. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व पालक यांच्यात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. तसेच, शाळेच्या विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा संकलन तसेच प्लास्टिक जमा करण्यास सांगण्यात आले होते. प्लास्टिकपासून होणाऱ्या दुष्परिणामांचीही माहिती देण्यात आली होती. कुठलेही प्लास्टिक न वापरण्याचे आवाहनदेखील करण्यात आले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून शाळेला या स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. शाळेचा तृतीय क्रमांक आला असला तरी प्लास्टिकबंदी आणि प्लास्टिक कचरा संकलन हे उपक्रम यापुढेही कायम सुरु ठेवले जातील, नाशिक शहर प्लास्टिकमुक्तीसाठी नेहमी सहकार्य असेल, अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका ज्योती पवार यांनी व्यक्त केली. अभिनव बालविकास मंदिर शाळेला मिळालेल्या पारितोषिकाबद्दल मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. ठाकरे व सर्व पदाधिकारी-संचालक, शिक्षणाधिकारी यांनी शाळेचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत केले आहे.

### अंजनेरी येथे उभे राहत आहे पासग विहार ध्यान केंद्र

**नाशिक ।** आत्मा ते परमात्मा या अंतर्मुख प्रवासात "ध्यान", "मौन" आणि "आत्मचिंतन" यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या आत्मिक साधनेचा अनुभव अधिक सखोल व प्रभावी व्हावा यासाठी नाशिकजवळील अंजनेरी येथे पासग विहार फाउंडेशन तर्फे एक भव्य ध्यान केंद्र उभारले जात आहे. साडेबारा एकराच्या विस्तीर्ण परिसरात साकार होणाऱ्या या केंद्राचा शिलान्यास सोहळा नुकताच संपन्न झाला. जैन समाजाच्या पुढाकाराने साकारत असलेले हे केंद्र सर्व धर्मीयांसाठी खुले असून, सर्वसामान्यांनाही आत्मशांती व अंतर्मुखता साधता यावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पौराणिक काळापासून अंजनेरीला ध्यानासाठी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. श्री हनुमानांच्या जन्मापूर्वी त्यांच्या माता अंजनी यांनी याच स्थळी तपश्चर्या केली होती. अंजनेरीच्या डोंगररांगांमध्ये अनेक प्राचीन गुहा असून, त्या ध्यानधारणेची साक्ष देतात. विशेष म्हणजे, येथील एका गुहेमध्ये अडीच लाख वर्ष जुनी भगवान शांतिनाथांची मूर्ती आजही अस्तित्वात आहे. या ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक वारशामुळे अंजनेरीची निवड ध्यान केंद्रासाठी करण्यात आली आहे. केंद्राच्या उभारणीत पर्यावरणस्नेही दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे – सौरऊर्जा, पर्जन्य जलसंचयन, नैसर्गिक बांधकाम साहित्याचा वापर आणि पर्यावरण संवर्धन यावर विशेष भर दिला जात आहे. या ध्यान केंद्रात ध्यानासाठी स्वतंत्र कक्ष, निवाससाठी खोल्या, कला दालन, ऑडिटोरियम अशा आधुनिक व शांततामय सुविधा असणार आहेत. हा संपूर्ण प्रकल्प वास्तुविशारद शैलेश देवी यांच्या मार्गदर्शनाखाली डिझाईन करण्यात आला असून, पुढील २४ ते ३६ महिन्यांत तो पूर्णत्वास जाणार आहे. पासग विहार ध्यान केंद्र – केवळ इमारत नव्हे, तर एक आत्मिक चैतन्याची जागा... अशीच नवी उमेद घेऊन अंजनेरी आपल्या अध्यात्मिक ओळखीला पुन्हा उजाळा देत आहे.

### जम्परोप स्पर्धेत सेंट फ्रान्सिस खेळाडूंचे सुवर्ण यश

**नाशिक ।** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत नंदुरबार येथे महाराष्ट्र राज्यस्तरीय शालेय जंपरोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधीत्व करतांना नाशिकच्या सेंट फ्रान्सिस हायस्कूल, तिडके कॉलनीच्या खेळाडूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करून घवघवीत यश मिळवले. यामध्ये ३० सेकंड स्पीड रिले या प्रकारात जीनांग शाहा, अद्वैत खैरनार, ओम मराठे आणि प्रतीक मानकर यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. तर डबल अंडर रिले या प्रकारात आरुष जाधव, देवेश गायधनी, ओम मराठे आणि जीनांग शहा यांनीही सहभाग घेत चांगली कामगिरी नोंदविली. खेळाडूंच्या या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. ए. एफ. पिंटो, डायरेक्टर ग्रेस पिंटो मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक संजय पाटील, पर्यवेक्षिका आयडा फर्नांडिस, गुरमीत शेटे आदींनी खेळाडूंचे कौतुक केले. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक विक्रम दुधारे आणि पवन खोडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

### निफाड होरायझन अकॅडमीत सेविकांना भेटवस्तू वाटप

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित निफाड येथील होरायझन अकॅडमीत महाराष्ट्र व कामगार दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांच्या हस्ते सर्व शिक्षकेतर कर्मचारी व सेविकांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी कैलास कोटकर यांनी ध्वजवंदन केले. यावेळी शालेय सेविका रंजना वडघुले व राजू बेंडकुळे यांनी कामगार दिनाचे महत्त्व विशद केले. प्रत्येक आस्थापनांमध्ये सेवकांचा वाटा किती महत्त्वाचा आहे व त्यांना सर्वांनी सन्मानपूर्वक वागणूक दिली पाहिजे हे मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी सांगितले. जयेश ढोमसे यांनी सूत्रसंचालन केले.

## पिंपळनेरना लोकं शांत व संयम ठेवणारा शेतसं...

# राजकारण बाजुले ठेवा अन् रस्तानं थांबेल काम पुरं करा...



### नगरपरिषदेचे स्वप्न बघणाऱ्यांनो जरा इकडे लक्ष द्या..!

पिंपळनेर-सटाणा मार्गावरील शहरातून जाणाऱ्या १ ते १.५ किमी रस्त्याच्या कामात अनेक विघ्न येत आहेत.त्यामुळे ग्रामस्थांकडून संबंधितांना वारंवार जाब विचारला जातो मात्र त्यांचे केवळ संभाषणातून समाधान केले जाते.या प्रकारामुळे नागरिकांकडून रोष व्यक्त केला जात आहे.तर आगामी पिंपळनेर नगरपरिषदेवर निवडून येण्याचे स्वप्न बघणाऱ्या नेते मंडळींनी या रस्त्याच्या कामाकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत नागरिकांकडून सोशल मीडियावर व्यक्त केले जात आहे.

**पिंपळनेर ।** मोठ्या थाटामाटात सुरू झालेल्या प्रलंबित रस्त्याचे काम अनेक वर्षांच्या संघर्षानंतर सुरू झाले त्यामुळे पिंपळनेर वासीयांसह वाहनधारकांनी आनंद व्यक्त केला.परंतु सदर रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटला आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गिट्टी,खडी टाकल्याने वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे.

परिणामी मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.कुठल्याही प्रकारच्या पर्यायी उपाययोजनांची व्यवस्था न केल्यामुळे मोठी दुर्घटना या ठिकाणी होऊ शकते असे चित्र या मार्गावर दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे दिसत आहे.आधीच रस्त्यावरील धूळ व खड्डेमय रस्त्यामुळे पिंपळनेरवासियांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यानंतर चांगला रस्ता होईल या आशेने सर्वजण प्रतीक्षेत आहेत.

अनेक राज्यांना जोडणारा हा महत्वाचा महामार्ग असल्याने येथे अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ असते.कोट्यावधी रुपये मंजुर होऊन या रस्त्याचे काम सुरू झाले आहे.मात्र रस्त्याच्या कामाभोवती संकटांचे ग्रहण लागल्याचे वारंवार अधोरेखित झाले आहे. रस्त्यावर पसरलेली खडी डोकेदुखी ठरत असून वारंवार वाहतूक कोंडी होत आहे.दोन्ही बाजूने होणाऱ्या दळणवळणामुळे वाहने एकमेकांना लागून अपघाताची शक्यता वाढत आहे.अनेक संघर्षमय घडामोडी घडल्यानंतर रस्त्याच्या कामाचा मुहूर्त लागला आहे.त्यामुळे या रस्त्याचे काम भक्कम व गुणवत्तापूर्ण होईल अशी अपेक्षा पिंपळनेरकरांना आहे.रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल या अपेक्षेने सर्वजण प्रतीक्षेत आहेत.

## सटाणा नगर परिषदेचा भोंगळ कारभारामुळे अपघातांना निमंत्रण



**सटाणा ।** नगर परिषद हद्दीतील शिवाजी नगर येथील साठ फुटी रस्त्यावरील गटारीच्या चेंबरवर ठेवलेल्या जाळीमुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे.

मागील काही दिवसापूर्वी ह्या गटारीच्या चेंबरवर ठेवलेली जाळी तुटून अपघात घडत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या त्यानंतर झोपलेले प्रशासन जागे झाले व त्यांनी एक लोखंडी जाळी बनवून त्या चेबरवर ठेवली. परंतु ती जाळी ठेऊन अपघात थांबण्याऐवजी वाढत गेले आहेत. यामुळे सटाणा नगर परिषदेत सुरु असलेला भोंगळ कारभार सिद्ध झाला आहे. सदरचे चेबर हे रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आली असून त्या रस्त्यावर मुख्य भाजी बाजार व बँका असल्याने मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या ठिकाणी योग्य उपाय योजना करणे गरजेचे असताना नगर परिषद प्रशासन फक्त चाल ढकलपणा कडुन वेळ मारून नेत आहे. सदरच्या चेंबरवर फक्त लोखंडी झाली ठेवून देण्यात आली आहे. लोखंडी झाली सुरक्षितपणे बसवने गरजचे होते परंतु तसे न केल्याने या जाळीमुळे रोज अपघात होत आहेत. सायंकाळच्या सुमारास भाजीपाल घेउन जाणारे एक वाहन ह्या चेंबर वरून जात असताना चेबरची लोखंडी पट्टी गाडीच्या ऑइल फिल्टर मध्ये अडकल्याने त्या गाडीचे ऑइल फिल्टर तुटून वाहनाचे नुकसान झाले व रस्त्यावर ऑइल पडल्याने तीन चार वाहने याठिकाणी स्लिप होऊन अपघात झाले.

स्थानिक तरुण व शिवाजी नगर मित्र मंडळाच्या सदस्यांनी पुढाकार घेत लगेच रस्त्यावर माती टाकत हे ऑइल पुसण्याचे काम केले. परंतु नगर परिषद प्रशासणाला याबाबत स्थानिकांनी कल्पना देऊनही कुठलीही कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. आता नगर परिषद नागरिकांचे जीव जाण्याची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# अन्यायाविरोधात हजारो पालकांचे शाळेत, पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या आंदोलन

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक संस्थेची अभिनव बाल विकास मंदीर सिडको, नाशिक या शाळेत आज मुलांचा निकालपत्र वाटप होते परंतु ज्या पालकांनी शाळेची फी भरलेली नाही म्हणून विद्यार्थ्यांचे निकालपत्र शाळेने अडवून ठेवलेत. ही शाळा 100% खाजगी अनुदानित शाळा आहे. तरी ही शाळा व संस्था प्रशासन पालकांकडून बेकायदेशीर पणे 7500 रुपये फी वसुल करीत आहे, या संधर्भात पालक गेल्या 2 वर्षांपासून लढा देत आहेत शिक्षण विभागाने आदेश दिलेले आहेत अनुदानित शाळेत पालकांकडून फी वसुल करता येणार नाही, मागील आठोड्यात शिक्षण उपसंचालक चव्हाण साहेब यांनी चौकशी समिति गठीत केली होती त्या चौकशी समितीचे अध्यक्ष सौ. किरण कुवर धुळे शिक्षण अधिकारी हे होते यांनी शाळेच्या शेराबुक मध्ये स्पष्ट शब्दात लिहून मुख्याध्यपिका यांना कडक शब्दात सांगितले होते की शिक्षण हक्क कायद्यानुसार तुम्हाला एकही विद्यार्थ्यांचा निकालपत्रक / गुणपत्रक, शाळेचा दाखला अडवता येणार नाही, तसेच मुलांचे पुढील वर्षाचे प्रवेश तुम्हाला थांबवता येणार नाहीत हे शेराबुकात लिहले आहे,

तरी ही पालकांना निकालपत्रक शाळा प्रशासनाने अडवून ठेवलेले आहेत, या विरोधात आज हजारो पालक शाळेत एकत्र येऊन ठिय्या आंदोलन केले, शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पवार, शाळेचा अधीक्षक काकळीज, संस्थेचे शिक्षण अधिकारी यांनी महिला पालकांना व पुरुष पालकांना अतिशय हीन व लाज्जस्पद शब्दात महिलांना लज्जा निर्माण



होईल अश्या भाषेत सवांद साधला, पालकांनी याचा तीव्र निषेध केला म्हणून शाळा प्रशासनाने अंबड पोलीस स्टेशनं चे पोलीस निरीक्षक हांडे व त्यांचे सहकारी यांना बोलून घेतले, पालकांवरच दबाव आणण्याचा प्रयत्न केला गेला, शाळेतील मुख्याध्यापिका, व इतर स्टाफ संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांच्या सांगण्यावरून पालकांना काही ही नं सांगता पालकांना निकाल नं देता निघून गेलेत, या संधर्भात शिक्षण उपसंचालक बी. बी. चव्हाण यांना पालकांनी फोन केला शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पवार व संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी चव्हाण सर यांचे फोनघेणे व फोनवरून बोलणे टाळले, शाळा व संस्था प्रशासन इतके भ्रस्ट झाले आहेत की ते शिक्षण उपसंचालक यांनाही जुमनात नाहीत तर ते पालकांवर किती अन्याय करीत असतील, शाळेने पालकांना न्याय दिला नाही म्हणून शाळेतील शेकडो महिला व पुरुष पालक शाळेतून थेट अंबड पोलीस स्टेशनं पर्यंत पाई चालत जाऊन अंबड स्टेशनं चे पोलीस निरीक्षक हांडे यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल केलेली आहे. शाळा प्रसासन पालकांना खोट्या केसेस मध्ये अडकवण्याच्या प्रयत्नात आहेत. शिक्षण उपसंचालक बी. बी. चव्हाण यांनी सर्व पालकांना आश्वासन दिले आहे येत्या 2-3 दिवसात वरिष्ठ पातळीवर स्वतः तक्रार करून शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव पाठवणार आहेत. म्हणून पालकांनी त्यांच्या विनंतीला मान देऊन आजचे ठिय्या आंदोलन मागे घेतले आहे येत्या 1 जून पर्यंत शाळा व संस्था प्रशासनाने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व दाखले नं दिल्यास तसेच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात मोफत प्रवेश नं दिल्यास शाळा सुरु होईल त्याच पहिल्या दिवशी पुन्हा शेकडो पालक शाळेत येऊन ठिय्या आंदोलन करणार आहेत.

# विंचूमध्ये धान्य व्यापाऱ्याची आठ लाखांची फसवणूक

### लासलगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**विंचूर ।** विंचूर येथील धान्य व्यापाऱ्याची तब्बल ८.३६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. 'स्वराज्य ट्रेडर्स' या आडत दुकानाचे मालक सुशांत पोपट खुटे रा.उर्धुळ, ता. चांदवड यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, शुभम प्रकाश काळे रा. देशमाने, ता. येवला या परिचित व्यापाऱ्याने सोयाबीन खरेदीच्या बहाण्याने त्यांच्याकडून पैसे उकळले.

दि. ६ एप्रिल रोजी शुभम काळे याने खुटे यांच्याशी संपर्क साधून, चार-पाच ट्रक सोयाबीन विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यानुसार खुटे यांनी एका ट्रकसाठी व्यवहार निश्चित केला. पुढे दोन ट्रक घेण्याचे ठरवून, रोख व ऑनलाईन पद्धतीने अनुक्रमे ५ लाख आणि ३.२५ लाख रुपये योगेश विठ्ठल जगताप रा.वाकद, ता. निफाड यांच्या खात्यावर पाठवले. पैसे मिळाल्यानंतरही माल न पोहोचल्याने खुटे यांनी चौकशी केली असता, शुभमने दिलेला ट्रक नंबर आणि चालकाचा मोबाईल नंबर फर्जी असल्याचे आढळून आले. शिवाय वेफको वजन काट्यावर दाखवलेली पावतीही बनावट असल्याचे स्पष्ट झाले. या संपूर्ण व्यवहारात हर्षद पाटोळे या नावाचा काल्पनिक व्यक्ती देखील समोर आला आहे. त्यानंतर खुटे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून, फसवणूक रकमेचा एकूण आकडा ८ लाख ३६ हजार २२० रुपये आहे.

या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार किशोर लासुरकर करत असून, त्यांना सपोनि भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# श्रद्धा विहार प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात

### कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून महिलांनी गाजवल क्रिकेटच मैदान

**इंदिरानगर ।** परिसरातील श्रद्धा विहार कॉलनीत वुमन्स श्रद्धा विहार प्रीमियर लीग या महिला क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. आर्या बुडूख यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. केवळ कॉलनीपुरती मर्यादित असलेली ही स्पर्धा महिलांच्या सहभागामुळे एक संस्मरणीय उत्सव ठरली. या स्पर्धेमध्ये कौटुंबिक जबाबदारी सांभाळून महिलांनी क्रिकेटचे मैदान गाजवले.



२५ ते ५५ वयोगटातील ३० महिलांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेत महिला खेळाडूंचे तीन संघ बनवण्यात आले, रणरागिणी, आदिशक्ती आणि सियाराम वॉरियर्स. या संघांमध्ये सामने लावण्यात आले.क्रिकेटचा पूर्वानुभव नसतानाही महिलांनी अतिशय समर्पित आणि जोशपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या प्रयत्नाला परिसरातील नागरिकांनी भरघोस पाठिंबा दिला.या स्पर्धेसाठी श्रद्धा पाठक, ऐश्वर्या कोल्हे,सोनाली रत्नपारखी,जयश्री सोनवणे, नमिता मैंद, सोनाली जाधव, संगीता कोल्हे यांचे विशेष योगदान उल्लेखनीय ठरले. सचिन देशपांडे, संदीप चव्हाण आणि प्रसाद खोसे यांनी पंच म्हणून कामकाज पाहिले.

# साधुग्रामसाठी १००० एकर जागा; 'रामकाळ पथ' अंतर्गत सौंदर्यीकरणास १०० कोटींचा निधी

**नाशिक ।** येत्या २०२७-२८ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिका आणि शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर विकासकामांची आखणी सुरू आहे. साधूग्रामसाठी तब्बल १००० एकर जागा अधिग्रहित करण्यात येणार असून, रामकुंड ते राममंदिर परिसर "रामकाळ पथ" अंतर्गत सुशोभित केला जाणार आहे. यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार असल्याची माहिती मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी दिली.

या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या वसंत व्याख्यानमालेच्या चौथ्या पुष्पात "सिंहस्थ कुंभमेळा त्र्यंबकेश्वर, नाशिक २०२७ - २०२८" या विषयावर




परिसंवाद पार पडला. यावेळी खत्री बोलत होत्या. नाशिकच्या यशवंतराव महाराज पटांगणात झालेल्या या कार्यक्रमात विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, महंत भक्तीचरणदास

### सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी भव्य तयारी

महाराज, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मिलखेकर, सतीश शुक्ल आदी मान्यवर उपस्थित होते. प्रवीण गेडाम यांनी कुंभमेळ्यातील गर्दी नियंत्रणासाठी प्रयागराजच्या अनुभवाचा अभ्यास करून इंटिग्रेटेड कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटरच्या माध्यमातून नाशिक ते त्र्यंबकेश्वरमधील गर्दीवर डेटा विश्लेषणाद्वारे नियंत्रण ठेवण्यात येईल असे सांगितले. नाशिकच्या प्रमुख रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाशी जोडण्याचे काम पुढील दोन वर्षात पूर्ण केले जाणार आहे. तसेच गंगाघाट आणि त्र्यंबकेश्वर येथील जीर्ण मंदिरांचा विकास करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




परिसंवादानंतर 'भक्तीधारा' या कथक नृत्य कार्यक्रमाचे सादरीकरण संजीवनी कुलकर्णी व डॉ. सुमुखी अथणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. व्याख्यानमालेच्या प्रारंभी स्व. डॉ. वसंतराव पवार यांच्या कार्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत बेणी यांनी केले.

# चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न



झटपट रेसिपी

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.

# समजूतदार होणे गरजेचे

मॅच मेकिंग

मी एका मुलाच्या प्रेमात आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही एकमेकांना ओळखतो. मला तो आवडत असला तरी तो मात्र मला फक्त चांगली मैत्रीण मानतो. मी अनेकदा त्याच्याकडे प्रेमाची कबुली दिली. समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो माझ्यावर प्रेम करत नाही. मी त्याला खूप मिस करते. माझ्या मनातून त्याचे विचार जात नाहीत. मी त्याला मेसेज करत असते. सारखी त्याच्या मागे लागते. हे माझ्या स्वत्त्वाच्या विरोधात आहे. पण त्याच्यासाठी मी ही तडजोड करायला तयार आहे. पण यामुळे माझ्या आयुष्यातली भावनिक गुंतागुंत खूप वाढली आहे. मी काय करू?



**उत्तर :** तुझ्यापुढे सध्या भावनिक आव्हान आहे. पण आपली मतं दुसऱ्यावर लादता येत नाही. आपलं प्रेम समोरच्यावर जबरदस्तीने लादता येत नाही. तू या मुलाला समजावण्याचे खूप प्रयत्न केले. पण काहीच साधलं नाही. मला वाटतं की तुला स्वत:विषयी प्रेम वाटत नाही. तसंच तू अजूनही स्वत:ला स्वीकारलेलं नाही. त्यामुळे सर्वात आधी तू स्वत:चा विचार कर. तू भावनिकदृष्ट्या समजूतदार होणं गरजेचं आहे. दुसरं म्हणजे या भावनिक गुंतागुंतीतून तुला समुपदेशक बाहेर काढू शकेल. त्याची मदत घे. तुला आयुष्यात नेमकं काय हवं आहे हे आधी समजून घे. या मुलासोबत तुला दीर्घकाळ नात्यात राहायची इच्छा आहे का, तू त्याचा नकार पचवू शकत नाहीस, हे जाणून घे. तुला नक्की मार्ग मिळेल.

# भाजी विकणारा बनला डीएसपी!



अचिव्हर

**कठोर परिश्रम आणि जिद्दीने आयुष्य बदलता येते. त्यासाठी महाराष्ट्राचे आयपीएस अधिकारी नितीन बगाटे यांचे उदाहरण समर्पक आहे. पोलिस अधीक्षक कार्यालयाबाहेर भाजी विकणाऱ्या तरुणाचा त्याच ऑफिसमध्ये पोलिस अधीक्षक पदापर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास प्रेरणादायी आहे...**

बगाटे यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. गरीबीमुळे नितीनने आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी गावातील पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ भाजीपाला विकण्यास सुरुवात केली. बिकट परिस्थितीतही नितीनने आपले स्वप्न सोडले नाही. कुटुंबाचे भविष्य चांगले घडवणे हे त्याचे ध्येय होते. नितीनने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. हा प्रवास त्याच्यासाठी अजिबात सोपा नव्हता. त्याने अनेक वर्षे कष्ट केले. तो तीनदा मुलाखतीच्या फेरीपर्यंत पोहोचला; पण परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही. तरीही नितीनने हार मानली नाही.

अपयशातून धडे

अपयशातून शिकून तो प्रयत्न करत राहिला. अखेर मेहनतीचे फळ मिळाले आणि नितीन आयपीएस अधिकारी झाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी नितीनने काही महत्त्वाच्या टिप्स शेअर केल्या आहेत. त्याने तीन मुख्य मुद्द्यांवर जोर दिला आहे.

* मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करा : मूलभूत संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घ्या आणि मजबूत पाया तयार करा.

* चालू घडामोडींवर लक्ष ठेवा: चांगली वर्तमानपत्रे नियमित वाचा आणि देश आणि जगाच्या घडामोडींबाबत अपडेट राहा.

* समाज समजून घ्या: समाजाच्या समस्या आणि त्यांचे परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न करा. नितीनच्या मते, शिस्त आणि सातत्य हा कोणत्याही स्पर्धा परीक्षेतील यशाचा कणा असतो.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की दुनिया जब तुम मुस्कुरा दो, संवर जाए हम बेकरारों की दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम कुछ यूं बंधे हैं। वो साथ भी नहीं, हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और गुफ्तगू की आरजू, हम किससे करे बात कोई बोलता ही नहीं। |

टेक अपडेटस्


## ‘सोशल मीडिया’चा नवीन प्लॅटफॉर्म

सर्वांना एकमेकांशी जोडून ठेवण्यासाठी आज सोशल मीडिया आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्रामने जगाला एकत्र आणले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे तुम्ही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या लोकांशी संपर्क साधू शकता. मात्र आता एक नवीन अहवाल समोर आला असून त्यानुसार ‘एआय’ लवकरच लोकांना फेसबुक आणि इन्स्टाग्राम व्यतिरिक्त नवीन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा पर्याय देणार असल्याचे स्पष्ट होत आहे. ‘द वर्ज’ मधील एका अहवालात हे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, ओपन एआय ‘एक्स’सारखे सोशल नेटवर्क तयार करण्याच्या योजनेवर काम करत आहे. ओपन एआयने आपल्या ॲपचा प्रोटोटाइप तयार केला असून त्यात ‘चॅटजीपीटी’ची क्षमता असेल.



टेक टॉक

## व्हॉट्सॲपवर टाका मोठा व्हिडीओ



व्हॉट्सॲपवर व्हिडीओ स्टेटसचे तुकडे अपलोड करून तुम्हीही कंटाळले असाल तर आता दिलासा मिळणार आहे. व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांसाठी एक नवीन आणि उपयुक्त फीचर आणण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आता स्टेटसमध्ये मोठा व्हिडीओ टाकणे सोपे होणार आहे. आता व्हिडीओची स्थिती एक मिनिटाची नाही तर ९० सेकंदांची राहणार आहे. यापूर्वी तुम्ही एकावेळी फक्त ६० सेकंद पर्यंतचा व्हिडीओ अपलोड करू शकत होता. म्हणजेच आता ही मर्यादा ३० सेकंदांनी वाढवली जाणार आहे. याचा थेट फायदा मोठे व्हिडीओ स्टेटस शेअर करणाऱ्यांना होऊ शकतो. अर्थात सध्या हे फीचर फक्त व्हॉट्सॲप च्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ असा आहे की ॲपची चाचणी आवृत्ती वापरतात तेच हे फीचर वापरू शकतात. लवकरच हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी जारी केले जाईल. हे नवीन फीचर व्हॉट्सॲप अँड्रॉइड व्हर्जन २.२५.१२.९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

नवे काय?

## ‘व्हिओ’चा सर्वांत स्लिम मोबाईल

‘व्हिओ टी ४ फाईव्ह जी’ लवकरच भारतात लॉन्च होणार आहे. देशात लॉन्च होण्यापूर्वी कंपनीने आगामी हँडसेटची बॅटरी आणि चार्जिंग तपशील उघड केले आहेत. स्मार्टफोनची जाडी आणि वजन याचीही पुष्टी झाली आहे. यात क्वाड-वक्र डिस्प्ले आणि स्नॅपड्रॅगन चिपसेट असल्याचे सांगितले जाते.

फोनची प्रमुख वैशिष्ट्ये तसेच फोनची संभाव्य किंमत आधीच ऑनलाइन उघड झाली आहे. ‘व्हिओ टी ४ फाईव्ह जी’ मार्चमध्ये भारतात लाँच झालेल्या ‘व्हिओ टी ४ एक्स फाईव्ह जी’ सह-अस्तित्वात असण्याची अपेक्षा आहे. कंपनीने एक्स-पोस्टमध्ये पुष्टी केली आहे की ‘व्हिओ टी ४ फाईव्ह जी’ ७,३०० एमएच बॅटरी पॅक करेल. फोन ब्लूव्होल्ट बॅटरी एनोड मटेरियल आणि थर्ड-जनरेशन सिलिकॉन वापरेल. हा फोन त्याच्या मागील मॉडेलच्या तुलनेत १५.७ टक्के ऊर्जा घनता सुधारेल असे म्हटले जाते. कंपनीने पुढे दावा केला की, फोनची बॅटरी कार्बन नॅनोट्यूब कंडक्शन, इलेक्ट्रोड रीशेपिंग आणि नॅनो केज स्ट्रक्चर तंत्रज्ञानाचा वापर करेल. ते वेळेनुसार बॅटरीचे आरोग्य राखण्यास मदत करते.




हा फोन फ्लॅशचार्ज तसेच रिव्हर्स आणि बायपास चार्जिंगला सपोर्ट करेल. बायपास चार्जिंग फोनला बॅटरी बायपास करण्यास आणि चार्जरमधून थेट पॉवर वापरण्यास सक्षम करेल. ‘व्हिओ’ च्या मते, हा फोन देशातील सर्वात पातळ स्मार्टफोन असेल. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यात ७,३००एमएच बॅटरी असेल. व्हिओ टी ४ फाईव्ह जी’ ची एमरल्ड ब्लाझे आवृत्ती ७.८९ एमएम जाडी आणि १९९ ग्रॅम वजनाची असेल. फोन फँटम ग्रे शेडमध्ये येण्याची अपेक्षा आहे. याची किंमत २०,००० ते २५,००० रुपयांदरम्यान असण्याची शक्यता आहे.

# ब्रंचचा आनंद लुटा



फॅशन पॅशन

उन्हाळ्यात मित्रमंडळींसोबत ब्रंचला जाताना आपला फॅशन सेंस अवश्य जपा. तुमच्या ब्रंच सेशनसाठी या काही खास फॅशन टिप्स...

* कूल लूक मिळवायचा असेल तर ट्रेंडी टी शर्टवर एखादा ब्लेझर घाला. खूप उकडत असेल तर ब्लेझर काढूनही ठेवता येईल. एसीमध्ये ब्लेझर घाला.

* या दिवसात शॉर्टसपेक्षा फॅन्सी किंवा आरामदायी दुसरं काहीच असू शकत नाही. उन्हाळ्यात गारव्याची अनुभूती घ्यायची असेल तर पेस्टल शेड्सच्या शॉर्टस ट्राय करा. कॅमॉफ्लेज रंगही चालून जातील.

* कॅज्युअल लूकसाठी लोफर्स कॅरी करा. यामुळे तुम्हाला खूप आरामदायी वाटेल. रस्ट रेड, ऑलिव्ह ग्रीन तसंच पिवळ्या रंगातल्या शेड्स तुमचा लूक खुलवतील.

* उन्हाळ्यात गॉगल मस्ट आहे. चेहऱ्याला साजेसा गॉगल घाला. हटके रंगाच्या ऑफ बीट फ्रेम्स निवडताना अजिबात घाबरू नका. ट्रेंडी डिझाइन्सवर भर द्या.

* डोक्यावर छानशी टोपी घाला आणि गप्पाटप्पा करत ब्रंचचा आनंद लुटा.

# ट्रेकिंगसाठी तयार?



स्टे फिट

दोस्तांनो, ट्रेकला जायचं तर फिटनेस हवा. चलता है... हा ॲटिट्यूड अशावेळी उपयोगाचा नाही. फक्त जास्त उंचीवरच्या, कठीण ट्रेक्ससाठी तयारी करून भागत नाही. सोपे आणि साधे ट्रेक्स आणि ट्रेल्सही आपल्या फिटनेसची परीक्षा बघत असतात. त्यामुळे ट्रेक कोणताही असला तरी तंदुरूस्ती राखणं गरजेचं असतं. यासाठी अगदी साधे व्यायाम करता येतील.* धावण्याला परिपूर्ण व्यायाम म्हटलं जातं. संपूर्ण शरीराला याचे लाभ होतात. हा कार्डिओ व्यायामप्रकार आहे. यामुळे तुमचं शरीर हायकिंगसाठी तयार होतं. स्नायू बळकट होतात. स्टॅमिना वाढतो.

* स्क्वॉट्समुळे पायांची क्षमता वाढते. ट्रेकिंग करायचं तर पाय बळकट हवे. ही बळकटी स्क्वॉट्समुळे मिळते. स्क्वॉट्सचे अनेक प्रकार आहेत. त्यांचं मिश्रण करून तुम्ही पायांना शक्ती देऊ शकता. स्क्वॉट्समुळे हृदय बळकट होतं. रक्तदाब नियंत्रणात रहातो आणि रक्तातल्या साखरेचं प्रमाणही वाढत नाही.

* स्नायूंना बळकटी मिळवून देण्यासाठी लंजेस करा. फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लंजेसच्या मिश्रणातून पायांचे स्नायू बळकट होतात. इतकंच नाही तर वेड्यावाकड्या वळणांवर शरीराचा समतोल साधणंही यामुळे शक्य होतं.

* लेग लिफ्ट्समुळे पायांचे स्नायू ताणले जातात. लवचिकता वाढते. या व्यायामामुळे चालताना किंवा चढण्यामुळे येणारा अतिरिक्त ताण झेलण्यासाठी पाय सक्षम होतात.

* नवख्या ट्रेकर्सनी जिने चढण्यापासून व्यायामाला सुरूवात करावी. हा अगदी साधा आणि कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. जिने चढल्याने जॉगिंगपेक्षाही जास्त कॅलरी खर्च होतात. हृदय, मज्जासंस्थेचं आरोग्य सुधारतं.

# चला पुरुषवाडीला

भटकंती

निसर्गाची किमया आपल्याला थक्क करते. आपण अनेक नैसर्गिक चमत्कार भान हरपून बघत रहातो. आसपासचा निसर्ग सतत खुणावत असतो. वसंतातल्या कोकीळेच्या कूजनाने कान सुखावतात. प्रत्येक ऋतू निसर्गाचे वेगवेगळे रंग दाखवत असतो. असंच एक दृश्य पुरुषवाडीतही पहायला मिळतं. मे आणि जून महिन्यातल्या रात्री पुरुषवाडी काजव्यांच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या असतात. हा काजव्यांच्या प्रजननाचा काळ असल्यामुळे इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवात सहभागी होणाऱ्यांना काजव्यांचं मनोहारी जग अनुभवायला मिळतं. तुम्हीही काहीतरी वेगळं, भन्नाट करायच्या विचारात असाल



तर पुरुषवाडीची ट्रिप प्लॅन करा.

पुरुषवाडी हे अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातलं छोटंसं गाव. रेल्वे किंवा वाहनाने या ठिकाणी जाता येतं. नाशिकजवळच्या इगतपुरी स्थानकावर उतरून पुरुषवाडीला जाता येईल. नाशिक, पुणे, शिरडीवरूनही पुरुषवाडीला जाण्याची सोय आहे. २५ मे ते २३ जून या काळात इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. त्यातही जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांमध्ये लाखोंच्या संख्येने काजवे पहायला मिळतात. तसंच पावसाला नुकतीच सुरूवात होत असल्याने इथला परिसर हिरवागार झालेला असतो. काजवा महोत्सवासोबतच इथे बऱ्याच ॲक्टिव्हिटीज करता येतात. तुम्ही इथे तंबूत राहण्याचा आनंद तुम्ही लुटू शकता. नदीत डुंबू शकता. ग्रामीण जीवन अनुभवू शकता.चुलीवरच्या अस्सल ग्रामीण भोजनाचा आनंद घेऊ शकता. पुरुषवाडीत दोन दिवस अगदी मजेत जातील. त्यामुळे मे-जूनमध्ये छोटी ट्रिप काढायची असेल तर पुरुषवाडीला नक्की जा.

# लॅपटॉप स्लो झालाय?



स्टडी टॉक

अनेकजण ऑफिसच्या कामासाठी लॅपटॉप वापरतात. मात्र लॅपटॉपच्या स्लो स्पीडमुळे त्रस्त असणाऱ्यांचे प्रमाणही बरेच मोठे आहे. म्हणजेच लॅपटॉपवर गेम खेळणाऱ्यांपासून ऑफिसची कामे करणाऱ्यांपर्यंत लोक लॅपटॉपच्या मंदगतीने हैराण झाले आहेत. पण चांगली बातमी अशी आहे की, काही सोप्या आणि किफायतशीर युक्तीचा अवलंबून करुन तुम्ही लॅपटॉपचा वेग वाढवू शकता. स्मार्टफोन जुने होते तसतसे लॅपटॉपची कार्यगतीही कालांतराने हळू होते. पण काही सोप्या बदलांमुळे तुम्ही ही जुनी यंत्रणा कार्यक्षम बनवू शकता.

* लॅपटॉप हार्ड डिस्क ड्राइव्ह (एचडीडी) वर चालत असेल तर तो ‘एसएसडी’मध्ये बदला. ‘एसएसडी’मुळे डेटा ट्रान्सफरचा वेग लक्षणीय वाढतो. त्यामुळे संपूर्ण प्रणाली वेगवान होते.

* लॅपटॉपमध्ये फक्त चार जीबी रॅम असेल तर ते आठ जीबी किंवा १६ जीबीपर्यंत वाढवा. यामुळे लॅपटॉपची एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता वाढेल. रॅम वाढल्याने लॅपटॉपचा वेग मोठ्या प्रमाणात वाढतो आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यात कोणतीही अडचण येत नाही.

* अनावश्यक फाइल्स, सॉफ्टवेअर आणि प्रोग्राम डिलीट करा. स्टोरेज मोकळे केल्यास सिस्टमचे कार्य अधिक वेगवान होईल.

* विंडोज आणि इतर सॉफ्टवेअरच्या नवीनतम व्हर्जनमध्ये अनेकदा दोष निराकरणे आणि कार्यप्रदर्शन सुधारणा असतात. त्यामुळे वेळोवेळी सिस्टम अपडेट करत रहा. याशिवाय व्हायरस आणि मालवेअरही सिस्टीम मंदावू शकतात. अशा परिस्थितीत चांगले अँटीव्हायरस वापरुन प्रणाली सुरक्षित आणि प्रभावी ठेवू शकता.

* लॅपटॉप सुरू होताच आपोआप सुरू होणारे प्रोग्राम बंद करा. यासाठी टास्क मॅनेजर उघडा आणि स्टार्टअप टॅबवर जाऊन अनावश्यक ॲप्स बंद करा.

# डिजिटल मार्केटिंगमध्ये घडवा भविष्य

भविष्यवेध

आजच्या काळात प्रत्येकाला आवडीचे काम करायचे आहेच खेरीज त्यातून भविष्यात स्थिरता आणि चांगले उत्पन्नदेखील मिळण्याची अपेक्षा आहे. अशांनी डिजिटल मार्केटिंगमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेणे योग्य ठरेल.

इंटरनेटचा वाढता वापर आणि ऑनलाइन शॉपिंगचा ट्रेंड यामुळे हे क्षेत्र झपाट्याने प्रगत झाले आहे. डिजिटल मार्केटिंग ही एक प्रक्रिया असून त्यामध्ये कंपन्या सोशल मीडिया, ईमेल, ब्लॉग आणि डिजिटल जाहिरातींद्वारे आपली उत्पादने आणि सेवांचा प्रचार करतात. यामध्ये ऑनलाइन ओळख निर्माण करुन अपेक्षित प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोहिमा चालवण्याचा समावेश असतो. अलिकडे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म उदयास येत आहेत, तसतसे त्यांचा वापरदेखील बदलतो आहे. तेव्हा नवीन ट्रेंड समजून घेणे आणि ते ब्रँडच्या ऑनलाइन ओळखीवर कसा परिणाम करतात हे जाणून घेणे, हे डिजिटल मार्केटिंग व्यवस्थापकाचे काम आहे. ‘गुगल’ सारखे सर्च इंजिन कोणतेही अपडेट आणते, तेव्हा मार्केटिंग टीमला त्यांची रणनीती पुन्हा तयार करावी लागते. यामुळे हे करिअर आव्हानात्मक आहेच खेरीज ते बरेच काही शिकवून जाते.



**भविष्याचा उत्तम मार्ग**

आज पारंपरिक विपणन अस्तित्वात असले तरी अचूकता आणि कमी किमतीमुळे डिजिटल मार्केटिंगने वेगाने लोकप्रियता मिळवली आहे. यामध्ये लोक कुठून येत आहेत, वेबसाइटवर काय करत आहेत आणि कोणते तंत्र उत्तम परिणाम देत आहे हे तुम्ही सहज पाहू शकता.

**नोकऱ्यांना जास्त मागणी का?**


२०२८ पर्यंत डिजिटल मार्केटिंगचा आकार सुमारे २४.१ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल आणि तो ३२.१ टक्के दराने वाढेल असा अंदाज आहे. २०२७ पर्यंत सुमारे सहा अब्ज लोक इंटरनेट वापरतील. याचा सरळ अर्थ असा की, कुशल डिजिटल मार्केटर्सची गरज आणखी वाढेल. ‘लिंक्ड इन’ च्या मते, डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट आज सर्वात जास्त मागणी असणाऱ्या नोकऱ्यांपैकी एक आहे. ८.६ लाखांहून अधिक नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत.

**काय भूमिका?**

डिजिटल मार्केटिंगमध्ये ईमेल मार्केटिंग, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन (एसईओ), कॉपीरायटिंग, कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, डिजिटल जाहिरात आणि सर्च इंजिन मार्केटिंग (एसईएम) यासारख्या विविध भूमिकांचा समावेश होतो. प्रत्येक भूमिकेसाठी वेगवेगळी कौशल्ये आवश्यक असतात.

**किती पगार?**

डिजिटल मार्केटिंगमधील तुमचा पगार अनुभवावर, कौशल्यांवर आणि स्थानावर अवलंबून असतो. भारतातील डिजिटल मार्केटिंग मॅनेजरचे सरासरी वार्षिक वेतन सुमारे ६.४ लाख रुपये आहे तर अमेरिकेत ते १,२२,११८ डॉलर; ऑस्ट्रेलियामध्ये १,०९,८५७ डॉलर, ब्रिटनमध्ये ५०,६८३ आहे.



# शेअर बाजार वाढीसह बंद

## सेन्सेक्सने घेतली 295 अंकांची उसळी

मुंबई, दि. ५ प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजारात आज ५ मे रोजी मोठी तेजी दिसून आली. सेन्सेक्स २९५ अंकांनी वाढला. या वर्षी निफ्टी २४,४६१ या सर्वोच्च पातळीवर बंद झाला. परदेशी गुंतवणूकदारांकडून सतत खरेदी आणि कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाल्यामुळे बाजारातील भावना सकारात्मक राहिल्या. यामुळे आज गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४.७८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

आज शेअर बाजारात झालेली वाढ चौफेर होती. बीएसई मिडकॅप निर्देशांक १.४५ टक्क्यांनी वधारला. तर स्मॉलकॅप निर्देशांक १.२३ टक्क्यांनी वाढला. बँकिंग वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही वधारले. ऑटो आणि तेल आणि वायू शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स २९४.८५ अंकांनी वधारून ८०,७९६.८४ वर बंद झाला. तर निफ्टी ११४.४५ अंकांनी वाढून २४,४६१.१५ वर बंद झाला.



बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ५ मे रोजी ४२७.५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील व्यवहार दिवशी म्हणजेच शुक्रवार, २ मे रोजी ४२२.८१ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४.७८ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४.७८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

**सेन्सेक्स 80,796**

**निफ्टी 24,461**

सेन्सेक्समधील ३० पैकी २० शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये, अदानी पोर्ट्सच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ६.२९ टक्के वाढ झाली. तर बजाज फिनसर्व्ह, महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम), इटरनल आणि आयटीसीचे शेअर्स १.८७ टक्के ते ३.७३ टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले. तर सेन्सेक्समधील उर्वरित १० शेअर्स घसरणीसह बंद झाले. यामध्येही कोटक महिंद्रा बँकेचा शेअर्स सर्वाधिक ४.५७ टक्क्यांनी घसरला. दुसरीकडे, स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI), ॲक्सिस बँक, टायटन आणि इंडसइंड बँक यांचे शेअर्स ०.५% ते १.२६% दरम्यान घसरले.

आज अमेरिकेच्या कॉमेक्सवर सोन्याची किंमत ३२६५.५० डॉलर्स प्रति औंस इतकी आहे तर चांदीची किंमत ३२.२० डॉलर्स प्रति औंस इतकी आहे. यासोबत देशातील मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर (MCX) सोन्याची किंमत ९३,१३४.०० रुपये प्रति १० ग्रॅम आहे तर चांदीची किंमत ९४,१२०.०० रुपये किलो इतकी आहे.

# एकेकाळी भ्रष्टाचाराविरोधात पोस्टर घेऊन आंदोलन करणाऱ्या आमदाराला लाच घेताना रंगेहाथ अटक

जयपूर, दि. ५ वृत्तसंस्था

भारत आदिवासी पार्टीचे आमदार जयकृष्ण पटेल एकेकाळी राजस्थान विधानसभेत भ्रष्टाचाराविरोधात पोस्टर घेऊन आंदोलन करताना दिसत होते. आज तेच आमदार भ्रष्टाचाराच्या प्रकरणी एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. बेकायदेशीर खाणकामासाठी ते खाण माफियांना दोष देत असे, सरकार त्यांना संरक्षण देतेय असा आरोप आमदार सातत्याने करायचे. परंतु त्याच आमदारांना खाण माफियांकडून कोट्यवधीची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. जयकृष्ण पटेल पहिल्यांदा आमदार बनलेत आणि राजस्थानच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या आमदाराला लाच घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी एसीबीचे पोलीस महासंचालक डॉ. रवी प्रकाश म्हणाले की, आमदार जयकृष्ण पटेल आणि त्यांच्या निकटवर्तीयांचे फोन रेकॉर्डवर होते. कॉल रेकॉर्डिंगमध्ये लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. रविवारी ४ मे रोजी जेव्हा २० लाखांची लाच देण्यात आली तेव्हा हिडन कॅमेऱ्यात हे सर्व रेकॉर्ड करण्यात आले. जयपूर आमदार निवासाच्या बेसमेंटमध्ये आमदार रोकड मोजत होते, त्यानंतर त्यांचा चुलत भाऊ विजय आणि एका व्यक्तीला ती रक्कम दिली. त्यानंतर आमदार पुन्हा त्यांच्या खोलीत गेले. जेव्हा एबीसीचं पथकाने तिथे धाड टाकली तेव्हा रोकड सापडली नाही परंतु जेव्हा आमदाराचे हात धुतले तेव्हा त्यातून नोटांवर लावलेला रंग बाहेर पडला. त्याआधारे आमदाराला अटक करण्यात आली. आमदाराच्या अटकेचे ठोस पुरावे असल्याचं एसीबी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.



सकाळी १०.१६ मिनिटांनी आमदार जयकृष्ण पटेल यांना त्यांच्या वाहनात रोकड प्राप्त झाली. त्यांनी तिथेच नोटांची मोजणी सुरू केली. त्यानंतर त्यांनी ही रक्कम त्यांच्या चुलत भावाकडे सुपूर्द केली. विजय आणि एक अन्य व्यक्ती आमदाराकडून नोटांची बॅग घेऊन तिथून निघाले. त्यानंतर आमदार कारमधून खाली उतरत चालत त्यांच्या खोलीकडे गेले. एसीबीचे पथक १०.३० मिनिटांनी आमदाराच्या घरी पोहचले. लाच घेतल्यानंतर १४ मिनिटांनी एसीबीने ही धडक कारवाई केली.

आमदाराविरोधात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर एसीबीने त्यांचे मोबाईल नंबर ट्रॅक केले होते. त्यावर रेकॉर्डिंग ऐकली असता लाचेच्या रक्कमेचा उल्लेख झाला. एसीबीने हे सर्व रेकॉर्ड केले आहे. रेकॉर्डिंगमध्ये आमदार थेट विधानसभेत प्रश्न लावण्याचा उल्लेख करत धमकी देत असल्याचं ऐकायला मिळाले. १० कोटी नाही दिले अद्दल घडवेन असं आमदाराने म्हटलं. परंतु ही रक्कम खूप जास्त आहे असं म्हटल्यानंतर अडीच कोटीची डील फायनल करण्यात आली. या रक्कमेचा पहिला टप्पा म्हणून २० लाख रोकड रविवारी आमदाराला देण्यात आली. त्यावरच एसीबीने ही कारवाई केली.


# "फक्त लाल किल्लाच ? मग फत्तेपूर सिक्री का नाही?"

## सुप्रीम कोर्टाची सुलताना बेगम यांना फटकार

नवी दिल्ली, दि. ५ प्रतिनिधी

अखेरच्या मुघल सम्राट बहादूर शाह जफर यांचे वंशज असल्याचा दावा करत लाल किल्ल्यावर मालकी हक्काची मागणी करणाऱ्या सुलताना बेगम यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळली. "फक्त लाल किल्ल्यावरच दावा? मग फत्तेपूर सिक्रीवर का नाही?" असा सवाल करत सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पी.व्ही. संजय कुमार यांच्या खंडपीठाने ही याचिका 'पूर्णतः चुकीची' असल्याचे स्पष्ट करत नाकारली.

सुलताना बेगम या कोलकात्याच्या रहिवासी असून, त्यांनी दावा केला की त्या बहादूर शाह जफर यांच्या थेट वंशज आहेत. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी मुघल साम्राज्याचा अंत करत लाल किल्ला जप्त केला होता. त्यानंतर बहादूर शाह जफर यांना देशाबाहेर पाठवले गेले आणि त्यांची संपत्ती ताब्यात घेतली गेली. या पार्श्वभूमीवर सुलताना बेगम यांनी लाल किल्ला परत मिळावा, किंवा त्याबदल्यात सरकारने भरपाई द्यावी, अशी याचिका दाखल केली होती.



१९६० मध्ये सुलताना बेगम यांचे पती बेदर बख्त यांचा मुघल वंशज म्हणून सरकारने दावा मान्य केला होता आणि त्यांना पेन्शन सुरू केली होती. १९८० मध्ये त्यांच्या निधनानंतर सुलताना बेगम यांना देखील पेन्शन मिळू लागली. मात्र, ती अपुरी असल्याचे म्हणत त्यांनी २०२१ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पण ती फेटाळण्यात आली. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते.


सुलताना बेगम यांचा दावा फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने विचारले, "जर तुम्ही खरोखरच वारस आहात, तर फक्त लाल किल्ल्यावरच का दावा? मग फत्तेपूर सिक्रीवर का नाही?" या प्रश्नाच्या आधारे न्यायालयाने याचिकेची सद्यस्थितीत वैधता नसल्याचे सांगत ती नाकारली.

# संतोष देशमुखांच्या कन्येचे बारावीत घवघवीत यश

## वैभवीने मिळवले 85.33 टक्के गुण

बीड, दि. ५ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण महाराष्ट्रात हादरला होता. वडिलांच्या हत्येनंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संतोष देशमुखांची कन्या वैभवी, आपले चुलते धनंजय देशमुखांसोबत राज्यभर फिरत होती. तिने महाराष्ट्रभर आंदोलने केली, अनेक नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. वैभवीचे हे बारावीचे वर्ष होते, अशा कठीण परिस्थितीत तिने अभ्यास करुन बारावीमध्ये ८५.३३ टक्के गुण मिळवले आहेत.



बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्यावर्षी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे देशमुख कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. डोक्यावर दु:खाचा डोंगर असताना संतोष देशमुखांची कन्या वैभवी हिने १२ वीची परीक्षा दिली होती. या कठीण परिस्थितीमध्येही बारावीच्या परीक्षेत वैभवीने घवघवीत यश मिळवले आहे. या परीक्षेत वैभवी देशमुखला ८५.३३ टक्के गुण मिळाले आहेत.

# "सीआरपीएफ ने पाकिस्तानी महिलेशी लग्न करण्यासाठी परवानगी दिली होती"

## बडतर्फ झाल्यानंतर जवान ठोठावणार कोर्टाचे दार

नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यानंतर, भारत सरकारने देशात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना तात्काळ देश सोडण्याचे आदेश जारी केले. दुसरीकडे, सीआरपीएफ जवान मुनीर अहमदची पाकिस्तानी पत्नी मीनल खान हिचे प्रकरण सध्या चर्चेत आहे, जी तिचा व्हिसा संपल्यानंतरही भारतात राहत होती. पाकिस्तानी महिलेशी लग्न केल्याबद्दल सीआरपीएफ मुनीर अहमदला सुरक्षा दलाने बडतर्फ केले आहे. मुनीर अहमदने पाकिस्तानी महिलेशी विवाह केल्याची माहिती लपवून ठेवल्याचा आरोप सीआरपीएफने केला आहे. मात्र जवानाने आपण विवाह करण्यासाठ परवानगी घेतली होती असं म्हटलं.

केंद्रीय राखीव पोलीस दलातील कॉन्स्टेबल मुनीर अहमदविरुद्ध कारवाई कठोर कारवाई करण्यात आली. औपचारिक मान्यता नसतानाही मुनीर अहमदने पाकिस्तानी महिलेशी विवाह केला. त्यानंतर सीआरपीएफने मुनीर अहमदला राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक असल्याचे सांगत सेवेतून बडतर्फ केले. मुनीरवर पाकिस्तानी महिलेसोबतचे विवाह केल्याचे लपवून ठेवल्याची आरोप करण्यात आला आहे. मात्र मुनीर अहमदने हे आरोप फेटाळून लावले असून आपण विभागाकडून परवानगी घेऊन विवाह केल्याचे म्हटलं. तसेच कारवाईविरोधात कोर्टात जाणार असल्याचे अहमदने सांगितले.



सीआरपीएफ जवान मुनीर खानचा अडीच महिन्यांपूर्वी पाकिस्तानी नागरिक मीनल खानशी विवाह झाला होता. त्यानंतर ती व्हिजिटिंग व्हिसावर भारतात आली आणि नंतर तिने दीर्घकालीन व्हिसासाठी अर्ज केला. पण तिच्या व्हिसाची मुदत २२ मार्च २०२५ रोजी संपली आणि तरीही ती भारतात राहत होती. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यास सांगितले होते. त्यानंतर मीनल खानची दीर्घकालीन व्हिसासाठी मुलाखत घेण्यात आली होती. ज्या दिवशी ती अटारी-वाघा सीमेवर होती त्याच दिवशी जम्मू आणि काश्मीर हायकोर्टात तिच्या याचिकेवर सुनावणी पार पाडली. कोर्टाने अंतरिम आदेश दिल्यानंतर तिला सीमेवरून परत पाठवण्यात आले होते.

मात्र सीआरपीएफने मुनीर अहमदवर कारवाई करत त्याला बडतर्फ केले. "सुरुवातीला मला माझ्या बडतर्फीची बातमी माध्यमांद्वारे मिळाली. काही वेळानंतर मला सीआरपीएफकडून माझ्या बडतर्फीची माहिती देणारे पत्र मिळाले. हा माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी धक्का आहे. कारण लग्नापूर्वी मी माझ्या मुख्यालयातून पाकिस्तानी महिलेशी लग्न करण्याची परवानगी मागितली होती, तेव्हा मला परवानगी मिळाली होती," असे मुनीर अहमदने सांगितले. मुनीर म्हणाला की मला हा निर्णय मान्य नाही आणि या निर्णयाविरुद्ध कोर्टात जाणार आहे. परदेशी नागरिकाशी लग्न करण्यासाठी आवश्यक असलेल्या औपचारिकता आधीच पूर्ण केल्या आहेत," असेही मुनीर अहमदने सांगितले.

# पोलीस भरतीच्या सराव करण्याऱ्या तरुणाचा कुलरचा शॉक लागून मृत्यू

अकोला, दि. ५ प्रतिनिधी

अकोल्यात कूलरचा शॉक लागून एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अकोल्यातल्या कान्हेरी सरप येथे ही घटना घडली आहे. रोहित विठ्ठल बावस्कर असं मृत तरुणाचं नाव आहे. १८ वर्षांचा रोहित हा दररोज पोलीस भरतीसाठी सराव करायचा. अशातच रविवारी सकाळी चार वाजता नेहमीप्रमाणे पोलीस भरतीचा सराव करण्यासाठी झोपेतून उठलेल्या रोहितला पायात बूट घालत असताना कुलरचा जबर शॉक लागलाय. त्यात रोहितचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, मागील वर्षात कुलरचा शॉप लागून जवळपास ९ जणांना मृत्यू झाला होता. या वर्षात कुलरचा शॉक लागून मृत्यू झाल्याची ही पहिली घटना समोर आली. त्यामुळे नागरिकांनी कुलर वापरताना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी परदेशी चित्रपटांवर लादले १०० टक्के टॅरिफ, राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे दिले कारण



वॉशिंगटन, दि. ५ वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी परदेशात निर्मिती केल्या जाणाऱ्या सर्व चित्रपटांवर १०० टक्के टॅरिफ आकारण्याची घोषणा केली आहे. यावेळी ट्रम्प यांनी असा दावा केला की, अमेरिकेतील चित्रपट उद्योग अत्यंत वेगाने मृतावस्थेत जात आहे.

ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी आपला निर्णय जाहीर करताना म्हटले आहे की, त्यांनी वाणिज्य विभाग आणि युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्हला अमेरिकेबाहेर बनवल्या जाणाऱ्या चित्रपटांवर १०० टक्के टॅरिफ तत्काळ लागू करण्याचे अधिकार दिले आहेत.

"इतर देश आपल्या चित्रपट निर्मात्यांना आणि स्टुडिओना अमेरिकेपासून दूर नेण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. हॉलिवूड आणि अमेरिकेतील इतर अनेक क्षेत्रे उद्ध्वस्त होत आहेत. हा इतर देशांचा एकत्रित प्रयत्न आहे आणि म्हणूनच हा प्रकार राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहे", असा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे.

हॉलिवूड आधीच अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापार युद्धाच्या परिणामांचा सामना करत आहे. अशात चीनने अमेरिकेतील चित्रपटांचा कोटा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. चित्रपट बाजारपेठेतील टॅरिफ युद्धाचा परिणाम वॉल्ट डिस्ने कंपनी, पॅरामाउंट ग्लोबल आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यासारख्या महत्त्वाच्या पाश्चात्य स्टुडिओवर होण्याची शक्यता आहे.

# वंध्यत्वावर मात करणारे IVF तंत्रज्ञान

**काही वर्षांपूर्वी वंध्यत्व हा आपल्या समाजातील एक अत्यंत गंभीर असा विषय होता. विवाहानंतर एखाद्या जोडप्याला काही वर्षांपर्यंत प्रयत्न करून देखील अपत्य प्राप्ती होत नसेल तर अशा जोडप्याला वंध्यत्व आल्याची शक्यता जास्त असे. म्हणजे त्यांना नैसर्गिक प्रयत्नातून अपत्याची शाश्वतीच नसायची. मात्र आधुनिक वैद्यक शास्त्राने इतकी प्रगती केली कि आज आय व्ही एफ तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम पद्धतीने गर्भधारणा करून स्त्रीला अपत्यप्राप्तीचे सुख मिळणे सुलभ आणि सहजसाध्य गोष्ट बनलेली आहे. हे आयव्हीएफ तंत्रज्ञान नेमके काय आहे? याच संदर्भात डॉ. के. यू. कुंजीमोईदीन, प्रादेशिक वैद्यकीय संचालक, बिर्ला फर्टिलिटी आणि आयव्हीएफ | एआरएमसी यांचाऱ्शी केलेली बातचीत.**

**१] आयव्हीएफ हे तंत्रज्ञान नेमके काय आहे?**

अनेक जोडप्यांसाठी, कुटुंब सुरू करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. तथापि, जगभरातील लाखो लोकांना प्रभावित करणारी वंध्यत्वाची स्थिती लक्षणीय भावनिक आणि शारीरिक आव्हाने निर्माण करू शकते. वैद्यकीय शास्त्रातील प्रगतीमुळे, IVF (इन विट्रो फर्टिलायझेशन) आणि सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान (एआरटी) हे शक्तिशाली उपाय बनले आहेत, जे केवळ जोडप्यांना गर्भधारणा करण्यास मदत करत नाहीत तर माता आणि गर्भधारणेच्या परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा देखील करतात.



हॅलो डॉक्टर

**२]गर्भधारणेपूर्वी व्यापक तपासणी करणे आवश्यक असते का?**

IVF द्वारे मातृत्वाचे आरोग्य सुधारण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग म्हणजे व्यापक पूर्व-संकल्पना तपासणी. IVF करण्यापूर्वी, जोडप्यांचे अनुवांशिक परिस्थिती, हार्मोनल असंतुलन आणि मधुमेह किंवा उच्च रक्तदाब सारख्या आरोग्य समस्यांसाठी पूर्णपणे मूल्यांकन केले जाते. गर्भधारणेपूर्वी या समस्या ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन केल्याने गर्भधारणेशी संबंधित धोके लक्षणीयरीत्या कमी होतात. परिणामी, IVF द्वारे गर्भधारणेमध्ये प्रवेश करणाऱ्या महिला अनेकदा चांगल्या प्रकारे माहितीपूर्ण आणि वैद्यकीयदृष्ट्या तयार असतात, ज्यामुळे निरोगी गर्भधारणा होते.

IVF गर्भधारणेच्या वेळेवर चांगले नियंत्रण देखील सक्षम करते. गर्भावस्थेतील मधुमेह, प्री-एक्लेम्पसिया आणि गर्भपाताचे धोके यासारख्या अनेक मातृ गुंतागुंती आईच्या वयानुसार वाढतात. आयव्हीएफमध्ये, आईचे वय आणि आरोग्याची स्थिती इष्टतम असताना गर्भ तयार केले जाऊ शकतात आणि क्रायोप्रेझर्व (गोठवलेले) केले जाऊ शकतात, ज्यामुळे महिलांना अधिक लवचिकता मिळते आणि जेव्हा त्या शारीरिकदृष्ट्या तयार असतात आणि आरोग्याचे धोके कमी असतात तेव्हा निरोगी गर्भधारणा होते.

**३] सुरक्षित गर्भधारणा यशस्वी होते का?**

आयव्हीएफचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे अनेक गर्भधारणा कमी करण्यात त्याची भूमिका, एतिहासिकदृष्ट्या माता आणि बाळांसाठी एक महत्त्वाचा जोखीम घटक.आहे. पूर्वी, गर्भधारणेच्या यशाचा दर वाढवण्यासाठी अनेक गर्भ हस्तांतरित करणे ही सामान्य पद्धत होती, ज्यामुळे अनेकदा जुळे किंवा तिहेरी मुले होतात आणि गर्भधारणेच्या गुंतागुंत वाढतात. आता, सुधारित तंत्रज्ञान आणि प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक टेस्टिंग (पीजीटी) सारख्या भ्रूण तपासणी पद्धतींसह, एकल भ्रूण हस्तांतरण मानक पद्धत बनली आहे, ज्यामुळे अनेक गर्भधारणेशी संबंधित जोखीम लक्षणीयरीत्या कमी होतात आणि सुरक्षित गर्भधारणा सुनिश्चित होते.

**४]आयव्हीएफ घेणाऱ्या जोडप्यांना समुपादेशनाची आवश्यकता असते का?**

IVF घेणाऱ्या जोडप्यांना ART कार्यक्रमांशी संबंधित असलेल्या व्यापक समुपदेशन आणि समर्थन प्रणालींचा फायदा होतो. जीवनशैलीतील बदल, पौष्टिक मार्गदर्शन आणि भावनिक समर्थन संसाधनांबद्दलचे शिक्षण सुधारित माता आरोग्य आणि तयारीमध्ये लक्षणीय योगदान देते, गर्भधारणेच्या अनुभवांवर सकारात्मक परिणाम करते.

IVF आणि इतर सहाय्यक पुनरुत्पादक तंत्रज्ञान केवळ गर्भधारणेला सुलभ करण्यापलीकडे जातात. ते कठोर पूर्व-गर्भधारणा तपासणी, वेळेचे नियंत्रण, एकाधिक गर्भधारणे रोखणे आणि सघन वैद्यकीय देखरेख आणि समर्थनाद्वारे मातृत्वाच्या परिणामांमध्ये गहन, मूर्त सुधारणा देतात. जसजसे हे तंत्रज्ञान विकसित होत जाते तसतसे ते सुरक्षित आणि निरोगी गर्भधारणेचे आश्वासन देत राहतात, जोडप्यांना पालकत्वाचे स्वप्न साध्य करण्यासाठी सक्षम करतात.


लोकारोग्य

# वॉरन बफे वर्षअखेर निवृत्त, वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषणा

ओमाहा (अमेरिका), दि. ५ वृत्तसंस्था

जागतिक कीर्तीचे गुंतवणूकतज्ज्ञ वॉरन बफे यांनी 'बर्कशायर हॅथवे'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वर्षअखेर निवृत्त होण्याची घोषणा करत कंपनीच्या सुमारे आडीच लाख गुंतवणूकदारांना धक्का दिला. कंपनीचे विद्यमान उपाध्यक्ष ग्रेग अबेल आपली जागा घेतील, असेही त्यांनी भरगच्च बैठकीमध्ये जाहीर केले.

गेली सहा दशके भांडवली बाजार आणि बफे हे नाव जोडले गेले आहे. स्थानिक वेळेनुसार शनिवारी येथे झालेल्या गुंतवणूकदारांच्या मेळाव्यात आपल्या निवृत्तीची घोषणा केली. सभेच्या अखेरीस बफे यांच्याबरोबर नेहमीप्रमाणे प्रश्नोत्तराचे सत्र होते. या पाच तासांच्या सत्रात अखेरीस त्यांनी आपल्या निवृत्तीचे संकेत दिले. ''या वर्षाच्या अखेरीस ग्रेस मुख्य कार्यकारी अधिकारी होतील... ती वेळ आता आली आहे,'' असे मात्र ९४ वर्षीय बफे म्हणाले. निवृत्त झाल्यानंतरही आपली गुंतवणूक बर्कशायरमध्येच कायम ठेवण्याची घोषणा करत बफे यांनी अबेल यांच्यावर विश्वास दाखविला. ६२ वर्षांचे अबेल हे त्यांचे नैसर्गिक वारसदार मानले जात असले, तरी बफे तहहयात मुख्य कार्यकारी अधिकारीपदी राहतील, असे मानले जात होते.



भांडवली बाजारांतील बारकावे अचूक टिपून गुंतवणूक हे बफे यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. त्यांच्या गुंतवणुकीचे आकडे जाहीर झाल्यानंतर अनेक जण त्याला अनुसरून लाखो गुंतवणूकदार समभागांची खरेदी-विक्री करतात. जगभरातील भांडवली बाजारांमधील आकडे फिरविण्याची क्षमता असलेले गुंतवणूक तज्ज्ञ म्हणून बफे यांची ख्याती आहे.

# हेक्साहेल्थची सर्जिकल केअरसाठी 12 दशलक्ष डॉलर्सची मालिका ए पूर्ण



आरोग्यनीती


एक आघाडीचा तंत्रज्ञान-सक्षम शस्त्रक्रिया काळजी प्लॅटफॉर्म, हेक्साहेल्थने त्यांची १२ दशलक्ष डॉलर्सची मालिका ए निधी फेरी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. या फेरीचे नेतृत्व ओरिओस व्हेंचर पार्टनर्स आणि ३वन४ कॅपिटल यांनी केले होते, ज्यामध्ये नवीन गुंतवणूकदार एन्झिया व्हेंचर आणि आयटीआय ग्रोथ अपॉर्च्युनिटीज फंड, विद्यमान समर्थक चिराटे व्हेंचर आणि ओमिड्यार नेटवर्क इंडिया यांचा सहभाग होता. या निधीमुळे संपूर्ण भारतात सर्जिकल केअर कशी दिली जाते आणि अनुभव कसा घेतला जातो हे पुन्हा आकार देण्याच्या हेक्साहेल्थच्या मोहिमेला गती मिळेल.

हेक्साहेल्थच्या वाढीच्या पुढील टप्प्याला चालना देण्यासाठी नवीन निधी धोरणात्मकरित्या तैनात केला जाईल. प्रमुख उपक्रमांमध्ये नवीन शस्त्रक्रिया विशेष क्षेत्रांमध्ये विस्तार करणे, संपूर्ण भारतातील अतिरिक्त भौगोलिक क्षेत्रात प्रवेश करणे, रुग्णसेवेला अधिक वैयक्तिकृत आणि वर्धित करण्यासाठी एआय-संचालित प्लॅटफॉर्म तयार करणे आणि नवोन्मेष आणि प्रभाव वाढविण्यासाठी वरिष्ठ नेतृत्व पथकाला बळकटी देणे यांचा समावेश आहे.

आजपर्यंत, हेक्साहेल्थने भारतातील प्रमुख शहरांमध्ये ३०,००० हून अधिक शस्त्रक्रियांची सुविधा दिली आहे, ज्यामुळे रुग्णांना केवळ प्रक्रियाच नव्हे तर करुणामय, शेवटपर्यंत काळजीद्वारे मनःशांती मिळते. केवळ आर्थिक वर्ष २५ मध्ये, हेक्साहेल्थने सुमारे १५,००० शस्त्रक्रियांची सुविधा दिली, ज्यांचे मूल्य अंदाजे ₹१५० कोटी होते आणि सकारात्मक योगदान मार्जिन मिळवले, जे मजबूत युनिट अर्थशास्त्राचे संकेत देते. कंपनी आता नवीन शहरांमध्ये विस्तार करत आहे, लाखो गरजू लोकांपर्यंत रुग्ण-प्रथम दृष्टिकोन पोहोचवत आहे.

# औषधी बेलाची पाने

आपल्याकडे आयुर्वेदिक औषधी वनस्पतींना अधिक महत्व आहे. यामध्ये अनेक वनस्पतींचा समावेश केला जातो. हिरडा, कोरफड, हळद अशा अनेक घटकांचा वापर अनेक आजार बरे करण्यासाठी होतो. यातीलच एक महत्वाच्या घटक म्हणजे बेलपान होय. हो तुम्ही बरोबर एकले आहे. आपल्याला बेलपान म्हणजे केवळ त्याला महादेवाच्या पिंडीवर वाहिला जातो इतकच माहिती आहे. परंतु त्याहीपेक्षा बेलाचे अनेक औषधी फायदे आहेत, जे आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. आज आपण ते पाहणार आहोत.



आरोग्यम् धनसंपदा

बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते.

बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. अलीकडे या रुग्णांचे प्रमाण वाढीस लागले आहेत. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पाकिस्तानला समजवण्याची नाही तर धडा शिकवण्याची वेळ

## असदुद्दीन ओवैसी यांची पंतप्रधान मोदींकडे मागणी

हैदराबाद, दि. ५ वृत्तसंस्था

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन म्हणजे एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी पहलगाम हल्ल्यावरुन पुन्हा वक्तव्य केले आहे. पाकिस्तानला समजवण्याची वेळ निघून गेली आहे. आता पाकिस्तानला उत्तर देण्याची वेळ आली आहे, असे असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटले आहे. पाकिस्तान निर्लज्ज अन् अपयशी राष्ट्र आहे. त्यामुळे त्याला आता त्याने केलेल्या कृत्याबाबत शिक्षा देण्याची वेळ आल्याचे ओवैसी यांनी म्हटले आहे.



बिहारमधील एका प्रचारसभेत बोलताना ओवैसी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानवर जोरदार प्रहार केला. त्यांनी म्हटले की, आमचे सरकार पाकिस्तानला जोरदार उत्तर देईल. दहशतवाद संपवण्यासाठी भारत कठोर पावले उचलणार आहे. दहशतवाद्यांनी निर्दोष पर्यटकांची हत्या केली. त्यामागे पाकिस्तान असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतरही पाकिस्तानमधील राजकारणी पुरावे मागत आहे. पाकिस्तानला यापूर्वीही पठाणकोट, मुंबई हल्ल्याबाबत पुरावे दिले होते. परंतु त्यानंतरही पाकिस्तानने काहीच कारवाई केली नाही. पाकिस्तान निर्लज्ज राष्ट्र आहे. त्यामुळे त्याला समजवण्याची नाही तर शिक्षा देण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक दोन, चार महिन्यांत त्यांच्याकडून सामान्य लोकांची हत्या होईल, असे ओवैसी यांनी म्हटले आहे.

पहलगाम हल्ल्यात मृत्यू झालेल्या २६ पर्यटकांना शहीदचा दर्जा द्यावा, अशी मागणी ओवैसी यांनी केली. त्यांनी सांगितले की, पहलगाममध्ये मृत्यू झालेल्या पर्यटकांना सरकारने शहीदचा दर्जा दिला तर त्यांचा परिवाराचा योग्य सम्मान होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना शहीदचा दर्जा देण्याबाबत पावले उचलावी, अशी विनंती मी करत असल्याचे असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटले आहे.

ओवैसी यांनी भारतीय नौदलातील लेफ्टिनेंट विनय नरवाल यांची पत्नी हिमांशी नरवाल यांचा वक्तव्याचा संदर्भ घेत सांगितले की, पतीच्या मृत्यूनंतर त्यांनी मुस्लीम आणि काश्मीरविरोधात द्वेष दाखवला नाही. त्यांनी फक्त शांतता आणि न्यायाची मागणी केली. हिंदू-मुस्लीममध्ये विष कालवणाऱ्यांसाठी त्यांचा संदेश महत्वाचा आहे. देशाला द्वेषाची नव्हे तर शांतता आणि एकतेची गरज आहे. जेव्हा आपण प्रेम आणि बंधुता वाढवू तेव्हाच आपला देश मजबूत राहील, असे असदुद्दीन ओवैसी यांनी सांगितले.

# बुमराह नेतृत्वाच्या शर्यतीतून 'आऊट'

मुंबई, दि. ५ प्रतिनिधी

भारतीय क्रिकेट संघाच्या वेगवान माऱ्याचा प्रमुख आणि उपकर्णधार जसप्रीत बुमराह आता इंग्लंड दौऱ्यावर नेतृत्व करताना दिसणार नाही. जूनच्या अखेरीस सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडिया नवी रणनिती आखत असून, बुमराहला सर्व सामन्यांत खेळवले जाणार नसल्याचे संकेत मिळाले आहेत. भारतीय संघाचा इंग्लंड दौरा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या चालू हंगामाच्या समाप्तीनंतर सुरू होणार आहे. या दौऱ्यात भारतीय संघाला यजमान संघाविरुद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा अद्याप झालेली नाही. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात संघाची घोषणा करेल अशी शक्यता आहे. जसप्रीत बुमराह या दौऱ्यात पाचही कसोटी सामने खेळू शकणार नाही. निवडकर्ते वर्कलोड मॅनेजमेंट अंतर्गत हा निर्णय घेऊ शकतात. अशा परिस्थितीत बुमराहला या दौऱ्यात उपकर्णधारपदाची जबाबदारी दिली जाणार नाही.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com